Regd-No. N 150

# वऱ्हाडसमाचार.

Berar-Samachar.

वर्ष ४९ ] आकोला—सोमवार तारीख १५ माहे नोव्हेंबर सन १९१५ ई० [ अंक ४१

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाऊ च घेण्याची वहिवाट आहे.

---

### जाहिरात

**मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.**

या बँकेंत खालीं दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा त्यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ९।९।०९ } S. Clemens, एजंट

नो. नं २

---

**बाटलीवाला यांचें दंतमंजन.**

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ८४

**बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.**

यानें गजकर्ण, कुजली, खरूज यांचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ८४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु. वरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

DR. H. L. Batliwala. Sons & Co Ltd
N. N. 5 Dadar Bombay.

---

## चांदीचीं भांडीं

नाशिक येथें तयार केलेलीं सर्व प्रकारचीं सुबक व घाटदार भांडीं आमचेकडे विक्रीस तयार असतात. भाव माफक व्ही. पी. नें अगर रोखीनें पाठवू. मालाचे खरेपणाबद्दल ग्यारंटी देऊ.

पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन
रविवार पेठ नाशिक सिटी.
नो. नं. ६

---

**ब्रह्मविद्या ग्रंथ रत्नमाला**

या मासिकाचा वर्षारंभ माघ शु॰ १

## नोटीशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील.
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

सूचनाः— गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. यापुढें येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल

---

### विक्रीस तयार

आमचे छापखान्यांत दरखास्तीचे, वकील पत्राचे, परत भरल्याचे, लिस्टफार्म पर्च्यांचे व नकलेकरितां करावयाच्या अर्जांचे नमूने छापून तयार आहेत. ते आमचे छापखान्यात कोणत्याही वेळीं विकत मिळतील.

वऱ्हाडसमाचार कार्यालय, सदाशिवाश्रम, आकोलें } मॅनेजर

---

### श्री दत्तात्रय अलंकारालय कोल्हापूर

आमचे कारखान्यांत स्वतःचे देखरेखेखालीं, मुद्दाम तयार केलेले उत्तम सोन्याचे सुबक दागिने— मंगळसुत्र साज, ठुशा-जोड, गुलाबाचीं फुलें, बिल्वदळी टीका, मुद्रा, अम्रफुलें सार्थी व घागऱ्याचीं वगैरे सर्व जातीचा माल—तसेच चांदीच्या मासोळ्या, चाळ, उपकर्णी, तोडे, वाट्या, गडवे, वगैरे माफक दरानें मिळतील. आम्ही सर्व सोनें न्याशनलचें शंभर नंबरी वापरीत असतों. व डागाचा उपयोगही नियमितच केलेला असतो. यामुळें जिन्नस पांढरे पडण्याची अगर वाईट निघण्याची भीति बाळगण्याचें मुळींच कारण नाहीं. आमचे जिनसाची लाख काढून वजन तोलून पाहावें. गिऱ्हाइकाची खात्री करून देण्यास आम्ही तयार आहों. व्यापाऱ्यास कामिशन मिळेल. ऑर्डरी प्रमाणें माल तयार करून देऊं, चांदी सोन्याचे खरेपणाबद्दल आम्ही जबाबदार आहों. माल रोखीनें अगर व्ही. पी. नें पाठविला जातो. ऑर्डरी बरोबर एक रुपया अगाऊ पाठविला पाहिजे.

श्रीदत्तात्रय अलंकारालय—कोल्हापूर
नो. नं १९१

---

## कौतुकरत्नाकर

छिन्नमस्तानी धुमावती; मातंगी भैरव षोडश देवतांचे चित्रांसह

# आठ आण्यांत लूट

( खालील सर्व बुकें फक्त आठ आण्यास मिळतील. )

१ **कोकविद्या**—सचित्र व समग्र कोकशास्त्र
२ **रसायनविद्या**-सोनें चांदी कमावण्याची युक्ति
३ **मंत्रविद्या**—मंत्रसिद्धींच्या योगानें सर्व रोग बरे करणें.
४ **मृतात्मीं** संभाषण करण्याची युक्ती.
५ **गानविद्या**—गायनासंबंधीं शिकण्याची विद्या.
**वशीकरण**—विद्या.
**पत्ता**—स्पष्ट व बाळबोधींत लिहावा.
प्रयाग नारायण अग्रवाल अलीगड सिटी.


## नोटीस

नोटीस बेशमी १ मोला नवऱ्याचें नांव माहीत नाहीं. जात अहीर रा० दुनी ता० मेळघाट जि० उमरावती व २ पंचम रा० चिपोली ता मेळघाट व ३ गंगादीन बा माहीत नाहीं कानकुब्ज ब्राह्मण रा० पाव्या ता० मेळघाट व ४ बहेरोप्रसाद बा रामप्रसाद कायस्त रा० सादरावाडी ता० मेळघाट

यांसः—

खालीं सही करणार यांहिकडून नोटीस देण्यांत येते कीं माझा नवरा मरण्यास ८ महिने झाले. माझे नवऱ्याचे स्वतःचे कमाईची स्थावर जंगम जिनगी अजमास कींमत रुपये ७८ हजार रुपांयची आहे. त्यावर मालकी माझी असून माझे पश्चात माझी मुलगी नामे सुखरमीया इची आहे. तुमचा सर्वांचा व माझे नवऱ्याचा व आमचा आम्ने सदहू सर्व जिनगीशीं अगदींच संबंध नसून आमचे जिनगीसंबंधानें तुमचे मनांत नाहीं [illegible]

## नोटीस

रा. रा. नथाप्पा बा काळुभाप्पा वाणी रा. कारंजा.

यांसः—

खालीं सही करणार इजकडून या नोटीशीनें कळविण्यांत येते कीं माझा नवरा मयत झाल्यास सुमारें एक महिना होत आला. तो मेल्यानंतर ता. २९-९-१९ इ. रोजीं शनिवारीं माझे नवऱ्याचा चुलत पुतण्या नारायणशेठ्या आमचे पासून विभक्त राहत असलेला हा माझे नवऱ्याचे इस्टेटी बद्दल आपला हक्क सांगु लागल्या-मुळें तंटा होऊ नये म्हणून मी व ना-रायण असे दोघांनीं तुमचे जवळ यादीबर-हुकुम माझे मालकीचे सोन्या चांदीचे दागिने अजमासे किंमत रु. २९०० चे रोख रु. २०७ कीर्द खतावणी व रोकड मिळुन वह्या ३ व दस्तऐवजाचे दफ्तर १ असा माल तुमचे ताब्यांत दिला आहे. सदहु माल माझे नवऱ्याचे मालकीचा असल्याबद्दलचा उल्लेख तुमचे जवळ दिलेल्या यादींत केलेला असून तुम्हासही ठाऊक आहे. करितां वरील सर्व जिनसा ही नोटीस मिळाल्यापासून ८ दिवसाचे आंत तुम्ही माझे स्वाधीन कराव्या व माझी पावती घ्यावी. त्याबद्दल. माझा पुतण्या नारायण शेठ्या याचेकडून हरकत आल्यास त्याचा जबाब मी देईन. त्याच प्रमाणें वहीखात्यावरुन माझे नवऱ्याचे तुमचेकडे अजमासें ३००—४०० रुपये घेणें निघत आहे. त्याचा ही नोटीस पावल्यापासून ८ दिवसांत निकाल करावा येणें प्रमाणें माझा माल माझे ताब्यांत न दिल्यास अगर खाते बाकीचा निकाल न केल्यास मला कायदेशीर इलाज करावा लागेल. व त्याचा सर्व खर्च तुमचेवर बसेल कळावें ता.

## नोटीस

नोटीस १ रतीराम उर्फ नंदासिंग रजपुत व २ बळीराम पाटील माळकरी सर्व रा. बुधर ता. जि. आकोला

यांसः—

धुरपती मर्द मारुती ताले रा. बुसर ता. जि. आकोला तुम्हास नोटीस देण्यांत येते कीं, मजपासून तुम्हीं माहे १-१९ महिन्यांत दहा वर्षाचा माझे शेतीचा पट्टा लिहून घेतला आहे. त्यांत पट्ट्याचे रुपये मजला कोर्टासमक्ष कबुल करण्यास सांगून आम्ही तुमचा प्रॉमिसरी नोट लिहून देतो. असें तुम्ही मजला सांगितलें. वरुन पट्टा नोंदतेवेळीं मी पट्ट्याची रक्कम कबूल करुन घेतली आहे. त्या करारा प्रमाणें तुम्ही प्रॉ-मिसरी नोट लिहून दिली नाहीं. व रुपये ही देत नाहीं. मजला पट्ट्याचे दिवसापसून रुपये देतो, प्रॉमिसरी नोट लिहून देतो, असें चाळवित आले. पट्टा होण्यास बरेच दिवस होत आले, तरी आतां ही नोटिस पावल्यापासून आठ दिवसांत माझे पट्ट्याचे रुपये द्याव. अगर प्रॉमिसरी नोट लिहून द्यावी. तसें न केल्यास पट्ट्याचे शेतीचा तुमचा हक्क रद्द समजला जाऊन शेत आ-मचे ताब्यात घेण्याची रितीप्रमाणें तजवीज केली जाऊन नोटिशीचे खर्चासुद्धां नुकसा-नीचा दावा करणें भाग पडेल. ही नोटीस लिहून दिली. सही ता. ९-१०-१९ इ.

सही

१ धुरपती मर्द मारुती नि. आं. खुद
नो० नं० १८१

## जाहीरनोटीस

रा. रा. नारायण शेटे वाणी व नागाप्पा नागपुरे वाणी रा. कारंजा

यांसः—

त्रिवा असुन तुमचा त्याच्या इस्टेटींत जन्मभर त्याचे नांवावर बसून अन्नवस्त्राचा खाण्याचा हक्क आहे. मैताचे इस्टेटीचा वारस त्याचा पुतण्या नामें धोंडू सीताराम भवाने अज्ञान हा असून त्याचा पालन-कर्ता मी आहे. तरी तुम्हास या नोटी-शीनें बजावतो कीं मैताच्या इस्टेटीची अफ-रातफर तुम्ही कोणत्याच सबबीवर करूं नये. त्याची स्थावर जंगम इस्टेट गहाण खरेदी अगर पट्ट्यानें देऊं नये व उभे पीक ही विकूं नये. तसें केल्यास त्याची जबाबदारी तुमचे शिरीं येऊन जो वरील प्रकारानें ही इस्टेट घेण्याचा प्रयत्न करील तो फसेल व त्यास ही जबाबदार धरलें जाईल या करितां तुम्हास व सर्वत्रांस आगाऊ जाहिर केलें आहे. तुम्हा दोघी पैकीं जनीच्या अंगावर ६। तोळे सोनें आणि २४० तोळे चांदी आहे. व सार-जीचे अंगावर १ तोळा सोनें आणि ८० तोळे चांदी आहे. हाहि माल अफरातफर होऊं नये. कळावे ता० १ माहे आक्टोबर सन १९१९ इ.

सहीची नि० आंगठा
धोंडू वा सीताराम भवाने अ.
पा. क. लक्ष्मण कृष्णाजी
भवाने रा० आळंद याचा खुद
नो. नं. १८३

## नोटीस.

नोटीस बेशमी साहेबचंद ओठमल मार-वाडी दुकान मौजे धामक ता० चांदूर जि० यवतमाळ

यांसः—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुम्ही मी व माझा मुलगा नामे बाळकृष्ण वा बहेरजी अशा दोघांकडून ता० २ जून १९१३ इ०

अगर तुमचे दुकानांत जो त्या संबंधी हिशेब असेल तो दाखवावा न दाखविल्यास मला जो कायदेशीर इलाज योग्य दिसेल तो मी करीन. कळावे.

सहीची निशानी
बहेरजी कडताजी याचे
हातची असे

नो. नं. ३८४

---

## नोटीस

नोटीस बेशामी यशवंत बा गणपती सिंगणे कुणबी रा० सेंदुरजन ता० मेहकर यांसः—

नोटीस देणार कवरी मर्द यशवंता सिंगणे रा० अंजनी खुर्द ता० मेहकर नोटीस देते कीं मी तुमची लग्नाची बायको असून लग्न प्रसंग होण्यास १०।१२ वर्षें झालीं असतील. लग्न झाले दिवसापासून तुह्मी मजला आपले घरीं एक दोनवेळ नेले असून मजला फार दुष्ट रितीनें वागविले व तुह्मी माझे अंगावर चिमणीचें तेल घालून फुकून देण्याची ह्मणजे मजला जाळून टाकण्याची भीती दाखवून आपले घरून काढून दिले. मी माझे आईबापाचे घरीं लोकांचें कर्ज काढून उदरनिर्वाह करीत आहे. माझे खाण्यापिण्याचा व कपडे लत्त्याचा तुह्मी कांहींच बंदोबस्त ठेविला नाहीं. सबब तुह्मास या नोटीशीनें कळविण्यांत येते कीं ही नोटीस पावल्यापासून ५ पांच दिवसांचे आंत तुह्मी माझे मागील पांच ५ वर्षांचे खर्चाबद्दल रुपये २५० देऊन व मजला चांगल्या रितीनें वागविण्याबद्दल जिमेदारी देऊन घेऊन जावे या प्रमाणें मुदतशीर तुह्मी न केल्यास हीच फारकती समजून मी दुसरा घरठाव करीन. मग तुमचा माझे वर नवरेपणाचा बिल्कुल हक्क चालणार नाहीं करितां अगाऊ नोटीशीनें कळविलें आहे कळावें ता. २१।१०।१५ इ.

सही
निशाणी कवरी मर्द यशवंता हची

रजिस्टर करण्यास गेलो. तेथें गेल्यावर अर्जून यानें उपस्थित तक्रार करून ती खरेदी रजिष्टर करण्याचे तहकूब करून गांवाकडे परत आलो तेथून पुढें अर्जून व जयराम यांचें मत एक होऊन पुढें ती खरेदी दुसरा कागद घेऊन लिहून ती खरेदी अर्जून यानें आपले एकट्याचे नांवानें घेतली. सबब तुह्मी आठ दिवसाचे आंत आमचे एक द्वितीयांश हिश्याचे शेत खरेदी करून देण्याचे करावे. नाहींतर कोर्ट मार्फत दावा करून व कोर्ट खर्च व या नोटिसीचा खर्चही आपणास भरावा लागेल कळावे ही नोटीस दिली.

सही
माधव सखाराम सोनार द. खु.

नो. नं. ३८६

---

## नोटीस

खालीं सही करणार सिवराम बापुजी रा. निंबी ता. बाळापूर यांसः—

या लेखावरून नोटीस नागोसा बहिरसा राहणार निंबी तालुके बाळापूर यास नोटीस देतो ती येणें प्रमाणेंः— तुह्मी आमचे पासून निंबी येथील शेत सर्वे नंबर १६ व २७ विकत घेणेचें कबूल केलें. त्या प्रमाणें आमचे कडून ता० १२।८।१५ इ. रोजी खरेदीखत लिहून घेतले व तुह्मी आपले जवळ ठेविले. आह्मी तुह्मास बरेच वेळा आमचे खरेदीखताबद्दलचा भरणा द्यावा व दस्तऐवज नोंदण्यास सांगितलें तरी तुह्मी आह्मास भरणा देत नाहीं व खरेदी खत नोंदून घेत नाहीं या वरून हें शेत आमचे पासून विकत घेणें नाहीं असें दिसते. तुह्मी आठ दिवसाचे आंत जर आमचे भरण्याचे पैसे दिले नाहीं व दस्तऐवज नोंदून घेतला नाहींतर आह्मी हे शेत वाटेल त्यास विकू व जें आमचे नुकसान होईल त्याबद्दल जबाबदार राहाल व

चा खर्च देऊन पंधरा दिवसाचे आंत फारकती देऊन टाकणें असें न कराल तर मी हीच फारकत समजून दुसरा नवरा करीन मग तुमचा नवरेपणाचा हक्क मजवर कोणतेही प्रकारचा राहणार नाहीं ही नोटीस लिहून दिली सही दस्तुर कृष्णाजी केशव.

सही
निशाणी बांगडी जानकी मर्द जानु इचे हातची असे मल्कापूर

---

**वऱ्हाडसमाचार**

भित्ति कार्तिक शुद्ध ९ शके १८३७

---

## सहकारित्व

### ( इंडियांतील सहकारी संस्था )

अंक ४० वरून पुढें चालूं

सहकारित्वाच्या अशा संघ शक्तीनें सांपत्तिक सुखावस्था आपोआप साध्य होते. आणि एकमेकांच्या संयुक्त कार्यक्रमामुळें एका तऱ्हेचा आत्मविश्वास वाढतो. आणि या संस्कारांच्या अंतर्लीन परिणामावरून अशी बळकट आशा वाटते कीं अधिक उच्च प्रतीची व आधिक भरभराटीची जीवनदशा ह्मणजे जिला आपण उत्तम धंदा, उत्तम शेती, व उत्तम जीवनक्रम असें ह्मणतो तिचा प्रत्यक्ष अनुभव लोकांना घेतां येईल. बाहेरच्या लोकांमध्यें नाहीं तर या चळवळीच्या प्रोत्साहकांमध्यें देखील अशी एक कल्पना आढळून आली आहे कीं या सहकारित्वांमध्यें नीतीचा कांहीं भाग नाहीं

संमेलन हीच सहकारी उपायाची मुख्य लक्षणा होय. आणि सरकारानीं शेतकऱ्यांच्या सुधारणेसाठीं जे दुसरे अनेक उपाय योजिले त्यांच्या मध्यें हें संमेलन नाहीं हें ध्यानांत ठेविलें पाहिजे.

३ जेव्हां हिंदुस्थान सरकारचें लक्ष सहकारित्वाच्या पद्धतीकडे लागलें, तेव्हां त्यांना मार्गदर्शक युरोपकडील अनुभव हा होय. सहकारी संस्थांना हिंदुस्थानांत किती तरी अनुकूलता आहे ही गोष्ट प्रथम मद्रास सरकारच्या ध्यानांत आली. आणि १८९२ त त्या वेळचे गव्हरनर लॉर्ड बेन लॉक यांनीं सर फ्रेडरिक निकॉलसन यांच्याकडे हेंच विशेष काम सोंपवून दिलें. त्याचा हेतु असा कीं त्यांनीं युरोपांतील शेतकीच्या पेढ्या व इतर ल्यांड ब्यांक्स यांचा तिकडील अनुभवाचा अभ्यास करून त्यांतील मुख्य तत्वाचें पारिशीलन करावें आणि असा अभ्यास केल्यावर हिंदुस्थानामध्यें त्या प्रकारच्या संस्था स्थापन करण्यासंबंधानें सूचना पुढें आणाव्या. मद्रास इलाख्यांत या सहकारीत्वाच्या प्रयोगाला चांगलें क्षेत्र मिळालें. जशा ग्रेटब्रिटनमध्यें फ्रेंडलीं आणि बिल्डिंग सोसायटीज आहेत तशाच पद्धतीच्या या इलाख्यांत 'निधी' मधून संस्था पूर्वीच्याच होत्या आणि त्यांना कांहीं अंशीं यशही आलले होतें. १८९७ व ९९ सालीं राजश्री निकलसन यांनीं युरोपामध्यें ज्या पद्धती प्रचलित होत्या त्यांच्या संबंधानें तपशिलवार इतिहास प्रसिद्ध केला. या पैकीं कांहीं पद्धती आजच्या स्थितीला जुन्या व नामशेषही झाल्या आहेत. तथापी या इतिहासांत जी माहिती संकलित केलेली आहे ती विशेष महत्वाची आहे. या इतिहासावरून व सहकारित्वावरील दुसऱ्या कित्येक राजमान्य ग्रंथावरून युरोपांत सहकारी संस्था कसकशा विकास पावल्या आणि जर्मन अग्रणी रेफा इस्सेन यानें सहकारी पतपेढ्यांच्या संस्था कोणत्या मार्गानें चालू केल्या

नेमिली असे आणि मंडळीचा सर्व कारभार कांहीं पैसा न घेतां करण्यांत येई.

स्कूल्झे डेलिट्झ लूझॅटी आणि इतर लोक यांनीं युरोपांत चालू केलेल्या संस्था विकास पावलेल्या आहेत, पण रेफी इस्सेनच्या तत्वांहून कांहीं अंशीं निराळ्या धोरणावर आणि भिन्नप्रकारच्या अशा या संस्था आहेत पण या संबंधांत सर फ्रेडरिक निकलसन यांचा अभिप्राय असा पडतो कीं कोणत्याही पद्धतींत कांहीं विशेष गम नसतो पण ती ती पद्धत चालू करणारा जो अग्रणी मनुष्य लागतो तसेच लोक सांपडले पाहिजेत. आणि ह्मणूनच ते आपल्या सार्‍या ह्मणण्याचा मथितार्थ असा सांगतात कीं रेफी इस्सेनचा शोध लावा.

## सैन्यबळ.

बाल्कन संस्थानें रणक्षेत्र उतरलीं आहेत. अशा वेळीं त्यांचें सैन्यबळ किती आहे हें कळणें अवश्य आहे. ह्मणून त्यांच्या व ग्रीसच्या सैन्यबळासंबंधाचे आकडे पुढें देतों:—

बल्गेरिया ३४०००० फौज

सार्विया १९५०००

ग्रीस १२००००

रूमानिया ४२००००

या शिवाय या राज्यांत सक्तीच्या लष्करी नौकरीचा नियम असल्यामुळें देशांतल्या सर्व तरुणांना लष्करी शिक्षण घ्यावेंच लागतें. अर्थात् जरूर पडल्यास हवी तेवढी फौज तयार आहे. फक्त बल्गेरियांतल्या मुसलमान लोकांना या सक्तीच्या नियमांतून मुक्त केलेलें आहे.

## आश्चर्यकारक आकाशयान

एका इटालियन इंजिनियरानें एक अत्यंत आश्चर्यकारक आकाशयान उर्फ विमान तयार

फार थोड्यांना झाली असेल. त्यावेळीं मांचु राजघराण्याचा नंद घराण्याप्रमाणें एका क्षणांत विध्वंस करून युआन-शिकाइ यांना प्रजासत्ताक राज्याचा प्रेसिडेंट नेमतांना चिनी लोकांनीं केवढा उत्साह दाखविला होता! येवढा उत्साह इतक्या अल्पकाळांत थंड होऊन पुनः राजघराणें प्रस्थापित करण्याची पाळी येण्यास काय कारणें झालीं—लोकमतांत येवढी क्रांति होण्यास अशी कोणती कृत्यें घडून आलीं, तें सांगणें फार कठीण आहे. युआनशिकाईच्या वर्तनांत तरी निदान आह्मां दूरस्थांस असें गैरवाजवी कांहीं दिसलें नाहीं. चीनी लोकमतांत कांहीं तरी खळवळ सुरू आहे ही बातमी या वर्षांतच विशेष करून लोकांच्या कर्णपथीं आली आणि मध्यंतरीं आपणांस राजमुकुट देण्यास कोणी तयार झाले तरी त्याचा आपण स्वीकार करणार नाहीं अशा आशयाचें युआनशिकाइ यांचें एका सरदाराशीं झालेलें संभाषण, व त्याच वेळीं राज्यक्रांती घडून आलीच तर आपण आपलें चंबूगबाळें आटोपून इंग्लंडमध्यें जाऊन राहूं असें युआनशिकाईनें दिलेलें बाणेदार उत्तर हें तर नुकतेंच प्रसिद्ध झालें. या गोष्टीला तीन महिने लोटले नाहींत तोंच पुनः राजसत्ता स्थापित करावयाची कीं काय याबद्दल चीन देशांतल्या एकंदर लोकांचें मत घेण्यांत येणार आहे अशी बातमी येते याचा अर्थ काय? गेल्या तीन चार वर्षांतल्या चीनच्या राज्यकारभाराविषयीं आणि युआनशिकाइ किंवा त्यांचे प्रतिपक्षी यांच्या कारस्थानाविषयींची खुलासेवार माहिती प्रसिद्ध होईल तेव्हांच या प्रश्नाचें समाधानकारक उत्तर देतां येईल. तोंपर्यंत चीनचें हें परावर्तन चीनच्याच नव्हे तर एकंदर प्राच्य राष्ट्रांच्या राजकीय प्रगतीच्या महत्त्वाकांक्षेला आणखी पंनास

चांगले प्रकाशित करीत असतात. आणि थोर व्यक्ति खोट्या मताभिमानाला बळी पडले नसते तर गेल्या पांचसात वर्षांतील धुमाकुळ एवढे माजले नसतें; पण जगांत कडू अनुभवासारखा शिक्षक नाहीं, आणि तोच इतिहास आह्मीं आतां चांगला शिकलों आहों. मवाळ व जहाल हे उपरोधीक शब्द बनले होते. ते यापुढें आपल्या देशाचे राजकीय मार्ग झाडणाऱ्या स्वयंसेवकाकडे आनंदानें बोट दाखवितील. आमच्या प्रांतातील निवडक मंडळी या प्रांतिक परिषदेला उद्यां एवढ्या मोठ्या समुदायानें व महान् उत्कंठेनें गोळा होत आहेत यापेक्षां या गोष्टीला निराळे उत्कृष्ट प्रत्यंतर तें कोणतें असणार? युरोपांतील महायुद्ध जोरानें गर्जून राहिलें आहे. अशावेळीं आमच्या प्रांतांतील धुरंधर मंडळी आपला विचारसृष्टींतील युद्धें मिटवून शांततेचा ध्वज उभारीत आहेत हें ब्रिटिश अमदानीचे मोठेंच वैभव होय. रा. ब. पंडीत बिशन दत्त शुक्ल हे आपल्या चारित्र्य प्रभावानें हा नवा ध्वज मुख्य राजधानींत उद्याच्या मंगल मुहुर्तावर उभारतील हा अपूर्व योग होय.

# वऱ्हाडवृत्त.

**हवामान**:—शरदृऋतु सारखा आरोग्यदायक ऋतु आपल्या वनसौंदर्यानें व फलपुष्पसमृद्धीनें लोकांचीं मनें आनंदानें डुलवीत आहे पण इहलोकच्या सुखाची खरी जाणीव देण्यासाठींच प्लेगरुपी मृत्यू मात्र इकडे तिकडे सैरावरा धावत आहे. आकोला येथें जरी मंदस्वरुप आहे तरी आसपासच्या गांवीं प्लेग

according to the conditions of sale filed in court by the undersigned.

All the right, title and interest of the Plff and the Defendants above named in the partnership in the Ginning Factory situated at Khamgaon known as the Ambica Ginning Factory.

The factory consists of 8 Gins driven by an oil engine (Hornsby) and is fitted with most of the necessaries required to work a factory and is in all respects ready for work. It contains an oil engine of 24 break horse power and all appliances, one lathe $10 \times 8\frac{1}{2}$ with all its appliances, one brick built tank with pipes &c, one office room with a tinned roof, one room for Chaprashi near the gate, latrines built with brick and mortor, 8 Gins with their appurtenances complete. All this is enclosed in a Compound surrounded by wire fensing.

The whole of this factory stands on land for which rent shall have to be paid to its owner Mr. Deshmukh, every year,

The public are requested to bid at the sale either personally or by agent duly authorized.

CONDITIONS OF SALE

The particulars of the property mentioned in the notice of sale have been stated to the best of the information of the Receiver, but the Receiver will not be answerable for any error misstatement or omission in the statement.

The amount by which the biddings are to be increased shall be determined by the receiver at the sale. In the event of any dispute arising as to the amount of a bid or as to the bidder the sale shall at once be held again.

The highest bidder shall be declared to be the purchaser provided always he be legally qualified to bid and provided that in the opinion of the Receiver the highest bid offered is so inadequate as to make it inadvisable

Regd-No. N 159

# वऱ्हाडसमाचार.

Berar-Samachar.

वर्ष ४९ ] आकोला--सोमवार तारीख २२ माहे नोव्हेंबर सन १९१५ ई० [ अंक ४२

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाऊ घेण्याची वहिवाट आहे.

---

### जाहिरात

**मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.**

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा त्यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ९।९।०९ } S. Clements, एजंट

नो. नं २

---

**बाटलीवाला यांचें दंतमंजन.**

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ८४

**बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.**

यानें गजकर्ण, कुजली, खरूज यांचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ८४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु. वरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

DR. H. L Batliwala. Sons & Co Ltd
N. N. 5 Dadar Bombay.

---

# चांदीचीं भांडीं

नाशिक येथें तयार केलेलीं सर्व प्रकारचीं सुबक व घाटदार भांडीं आमचेकडे विक्रीस तयार असतात. भाव माफक व्ही. पी. नें अगर रोखीनें पाठवूं. मालाचे खरेपणाबद्दल ग्यारंटी देऊं.

**पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन**
**रविवार पेठ नाशिक सिटी.**
**नो. नं. ४**

---

## नोटीशीचे दर

**दर ओळीस दीड आणा.**
**हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील.**
**नोटीस सुवाच्य असली पाहिजे.**

**सूचनाः**— गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. पाठीमागून येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल

---

## विक्रीस तयार

आमचे छापखान्यांत दरखास्तीचे, वकील पत्राचे, परत भरयाचे, लिस्टफार्म पर्च्याचे व नकलेकरितां करावयाच्या अर्जाचे नमूने छापून तयार आहेत. ते आमचे छापखान्यांत कोणत्याही वेळीं विकत मिळतील.

**वऱ्हाडसमाचार कार्यालय, सदाशिवाश्रम, आकोलें** } मॅनेजर

---

## श्री दत्तात्रय अलंकारालय कोल्हापूर

आमचे कारखान्यांत स्वतःचे देखरेखेखालीं, मुद्दाम तयार केलेले उत्तम सोन्याचे सुबक दागिने— मंगळसुत्र साज, ठुशा-जोड, गुलाबाचींफुलें, बिल्वदळी टीका, मुद्रा, अग्रफुलें साखीं व वाघाऱ्याचीं वगैरे सर्व जातीचा माल—तसेच चांदीच्या मासोळ्या, चाळ, उपकर्णी, तारें, वाट्या, गडवे, वगैरे माफक दरानें मिळतील. आह्मी सर्व सोनें न्याशनलचें शंभर नंबरी वापरीत असतों. व डागाचा उपयोगही नियमितच केलेला असतो. यामुळें जिन्नस पांढरे पडण्याची अगर वाईट निघण्याची भीति बाळगण्याचें मुळींच कारण नाहीं. आमचे जिन्नसाची लाख काढून वजन तोलून पाहावें. गिऱ्हाइकांची खात्री करून देण्यास आह्मी तयार आहों. व्यापाऱ्यास कमिशन मिळेल. ऑर्डरी प्रमाणें माल तयार करून देऊं, चांदी सोन्याचे खरेपणाबद्दल आह्मी जबाबदार आहों. माल रोखीनें अगर व्ही. पी. नें पाठविला जातो. ऑर्डरी बरोबर एक रुपया अगाऊ पाठविला पाहिजे.

श्रीदत्तात्रय अलंकारालय—कोल्हापूर
नो. नं १९३

---

## अस्सल अंगुरी.

# हिंग

केवळ एक आणा तो. पवित्र केशर ॥= तो. शुद्ध शिलाजीत. -॥- तो. वालिस कस्तूरी रु. २९ तो. तिबेती ममीरा रु. ३ तो.

**काश्मीर स्टोर्स श्रीनगर नं० ९**
नो० नं० ८

---

## ब्रह्मविद्या ग्रंथ रत्नमाला

या मासिकाचा वर्षारंभ माघ शु० ९ तिसऱ्या वर्षापासून ७२ पानांचें मासिक. वा० व० ट० खर्चासह तीन रुपये. यांत **श्रीशंकराचार्य, शंकरानंद,** व **विद्यारण्य** यांचे उपनिषदावरील **भाष्य, आत्मपुराण** व **अनुभूतिप्रकाश** हे ग्रंथ क्रमानें मूळ, अन्वय, अर्थ व विवरण यांसह प्रसिद्ध होतात. यांत हल्लीं बृहदारण्यकाचा भाष्यार्थ चालू आहे. मागील दोन वर्षांतील वीस प्रकरणें १० रुपयांस घेऊन तिसऱ्या वर्षी वर्गणीदार होणारास '**वैशेषिक दर्शन**' बक्षीस.

सनातन वैदिक **धर्माचें, तत्त्वज्ञानाचें** व सामाजिक विषयाचें विवेचन करणारें--

### आचार्य

पाक्षिक, दर एकादशीस नियमितपणें प्रसिद्ध होतें. पृष्ठें २४ वा० व० ट० खर्चासह १ रु० ८ आणे वरील मासिक घेणारास फक्त १रु० वरील विषयांशिवाय यांत संस्कृत काव्यें, नाटकें व इतर लहान लहान ग्रंथ यांचाही परामर्श केला जातो. धर्म संबंधीं प्रश्नांचीं समर्पक उत्तरेंही दिलीं जातात नमुना मागवा.

पत्ता— विष्णुशास्त्री बापट
२४१ सदाशिव पेठ पुणें.
नो० नं० ३

---

## हिंदुस्थानावर अरिष्ट

हिंदुस्थानांतील रहिवाशांच्या पाठीस ज्वर हिवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलें पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिवतापाचें औषध व गोळ्या रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर असें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रु.

**बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या**

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें स्वरूप, त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार तीव्र दूर होतात किं रु. १८८.

---

# कौतुकरत्नाकर

**छिन्नमस्तानी धुमावती; मातंगी भैरव षोडश देवतांचे चित्रांसह**
**पृष्ठसंख्या ६००; विषय ६०० वर आवृत्ति ९ वी. प्र. २००००,**

बंगाल्यांतील कामरूपदेशी हो विद्या फार प्रबल असून तिकडील नटेली, लंगोटि, छा छु करणारे अज्ञानवादी यांचेकडून खरी माहिती मिळवुन सिद्धनागार्जुन मंत्र महोदधि, महानिर्वाणतंत्र उड्डीश वगैरे ग्रंथाचे आधारें हा भानुमती ग्रंथ तयार केलेला आहे. ह्याच धर्तीवर प्रसिद्ध झालेल्या इंद्रजाल, जादुबाई इतरसंग्रह, कौतुकचिंतामणी, किमिया, गुप्त गारुडी विद्या वगैरे पुस्तकांचा ह्याचेपुढें हिशेब नाहीं. यांत कोणते विषय आहेत याचा विस्तार कळविणें फार कठीण आहे. मंत्र तंत्र व यंत्र विधिपूर्वक करणें नियम ग्रहादिकांचीं वर्णनें भानुमती यंत्र वशिकरण शास्त्र नानाप्रकारचे स्तंभन प्रयोग, उच्चाटन, जारण, मारण प्रयोगविधि, औषधी हुन्नर, नानारंग कला, आत्मविद्यामेस्मेरिझम प्रयोगविधि वगैरे अनेक विषय आहेत. किं. ट. व्ही. पी. सह १॥ रुपया

# कोकशास्त्र अथवा जीवनसौख्य.

ज्यांना खरोखरीच सौख्य भोगणें आहे त्या प्रत्येकांनीं हें पुस्तक अवश्य संग्रहीं ठेवावें. या पुस्तकांत कोणते विषय आहेत हे पुस्तकाच्या नांवावरून सहज समजण्याजोगें असल्यामुळें त्याचें वर्णन करणें नको किंमत १ रुपया. ट. ख. २ आणे.

पत्ताः— गंगाधर आर. आणि कंपनी.
हरिश्चंद्र बिल्डिंग मुंबई नं. ४

नो. नं. ३६४

# आठ आण्यांत लूट

( खालील सर्व बुकें फक्त आठ आण्यास मिळतील )

१ **कोकविद्या**—सचित्र व समग्र कोकशास्त्र
२ **रसायनविद्या**-सोनें चांदी कमावण्याची युक्ति
३ **मंत्रविद्या**—मंत्रसिद्धींच्या योगानें सर्व रोग बरे करणें.
४ **मृताशीं** संभाषण करण्याची युक्ती.
५ **गानविद्या**—गायनासंबंधीं शिकण्याची विद्या.
**वशीकरण**—विद्या.

**पत्ता**—स्पष्ट व बालबोधींत लिहावा.
प्रयाग नारायण अग्रवाल अलीगड सिटी.


## नोटीस

नोटीस बेशमी मार्तंडराव देवतराव ब्राह्मण हल्लीं मु० शेगांव

यांस—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं, तुह्मास सन १९०७ सालीं जे कुलमुखत्यारपत्र कोर्टाच्या कामा करितां दिले होते. ते मी या नोटिसी अन्वयें रद्द केलें आहे. सदर्हु मुखत्यारपत्रा-अन्वयें माझे वतीनें पुढें कोणतेंच काम करूं नये. ता. १६-११-१५

सही

माधवराव दादा हरदास रा. आडगांव

द० खुद

नो० नं० ३९०

## नोटीस

आह्मीं खालीं सह्या करणार मसीहुननिसा बेगम जवजे सयद शाहाआमरुल्ला कादरी आणि जीलानीबेगम जवजे सयद जलालोदीन कादरी दोघी राहणार वाशीम तालुके वाशीम जिल्हा आकोला.

यांजकडून

सयद आहमदपादशाहा वल्द शाहाजीयाउल-हाक जहागीरदार मौजे भटजी रा० औरंगाबाद महल्ला जुनाबाजार, यांस व सर्व लोकांस कळविण्यांत येते कीं, वरील सयद-आहमदपादशाहा यांस आह्मी दोघींनीं व मुकरमुननिसाबेगम व बुगदादीबेगम असे चौघींनीं आमचेतर्फे कुलमुखत्यारपत्र सन १९१५ इ० चे सप्टेंबर महिन्यांत दिले होते. परंतु वरील आमचे मुखत्यार सयद-आहमदपादशा हे आह्मी दोघी (मसीहुननिसा-बेगम व २ जीलानीबेगम ) पासी लबाडी करून व मुकरमुननिसाबेगम व बुगदादीबेगम यांजपाशीं संगीनमत करून आह्मा दोघींना बुडविण्या करितां रिसीव्हर कडून मिळालेल्या मिळकतीची आफरातफर करण्याच्या विचारांत आहां. तसेंच मुखत्यारनाम्यानें तुह्मास मिळालेल्या अधिकाराचा दुरुपयोग करण्याचा तुमचा विचार आहे. असें आह्मास समजले वरून आह्मी तारीख ११ नोवेंबर सन १९१५ इ० रोजीं वरील सयद आहमदपादशाहा मुखत्यार यांस वाशीम मुक्कामीं समक्ष तोंडीं सांगून त्यांचें मुखत्यारपत्र रद्द केलें आहे. व सर्व लोकांना जाहीर होण्या-करितां व सदर्हु सयद आहमदपादशा यांस स्पष्ट कळण्याकरितां या जाहीर नोटिशीनें कळविण्यांत आले आहे. तरी वरील सयद आहमदपादशाहा यांजपाशीं आमचे मुखत्यार ह्मणून कोणीही कोणतेही प्रकारचा व्यवहार करूं नये. केल्यास आह्मी बांधले जाणार नाहीं. व सयद आहमदपादशाहा यांसही कळविण्यांत येते कीं त्यानीं रिसीव्हर कडन घेतलेल्या सर्व रुपयांचा आह्मास हिशेब देऊन आमचे हिश्याचे सर्व रुपये आह्मास देऊन आमची लेखी पावती घ्यावी. व असे करण्याबद्दल ते स्वतः जबाबदार धरले जातील. आज तारीख ११ माहे नोव्हेंबर सन १९१५ इ० दस्तुर शेखइस्माइल अर्जनवीस वाशीम.

सह्या

१ मसीहाउननिसाबेगम जवजे सयद-शाहाआमरुला कादरी रा. वाशीम इचे हातची निशानी डावा आंगठा द. वर प्रमाणें

२ जीलानीबेगम जवजे सयद जला-लोदीन कादरी रा. वाशीम इचे हातची निशानी डावा आंगठा द. वर प्रमाणें

साक्ष

१ फैजअली आहेमदअली पेनशनर मुनसरीम रा. वाशीम द. खु.

२ ( उर्दू ) गवाहा सफदरअलीखां वल्द निसारअलीखां कन्ट्राक्टर बासम बकलम खुद.

नो. नं. ३९१

## पत्रव्यवहार

स. स. "वऱ्हाडसमाचार" कर्ते, यांस,

सुमारें ४-५ महिने झाले, येथील गुजराती शाळेकडून म्युनिसिपल कमिटीस मदती करितां अर्ज पाठवून सुमारें २॥ ३ महिने झाले. सदर्हू अर्ज फिनान्स कामिटी पुढें ठेविला आहे. अशी मला खाजगी माहिती मिळाली. परतु म्युनिसिपल कमिटी किंवा त्यांच्या फिनान्स कमिटी पैकीं कोणत्याहि कमिटीनीं त्या अर्जावर कांहीं एक विचार चालविला आहे, असें अद्याप बाहेर निघालें नाहीं. कोणत्याही एका निश्चयावर येण्यास किंवा तत्संबंधानें विचार करण्यास कोणती अडचण आली आहे हें समजल्याखेरिज शंका किंवा अनुमान काढणें व्यर्थ आहे; परंत इतकें सांगितल्या-खेरिज राहवत नाहीं कीं ज्यांच्या हातीं अमच्या शहराची वृद्धी व संरक्षेचें काम नियोजिलेलें आहे त्यांना येथील गुजराती लोकांकरितां फारशी कळकळ—इतकेंच नव्हे तर त्यांना न्याय देखील मिळावा एवढी इच्छा—आहे असें व्यक्त होत नाहीं. दक्षिणी व उर्दू भाषा बोलणाऱ्या करितां म्युनीसिपल कामिटीकडून कितीक शाळा आज किती वर्षांपासून निघाल्या आहेत हें सुविदित आहे. जेथें गुजराती लोकांची वस्ती दोनहजार पेक्षां ज्यास्त आहे, जेथें एक म्युनिसिपल गुजराती स्कूल चालण्या इतकी मुलांची संख्या आहे, जेथें गुजराती लोकांकडन म्युनिसिपल कमिटी बरीच रक्कम प्रत्येक सालीं रेटस् ह्मणून वसूल करिते, तेथें म्युनिसिपल कमिटीच्या प्रयत्नाशिवायच निघालेल्या व कांहीं वर्षें काम करून दाखविलेल्या एका शाळेस कांहीं मदत देण्यास जर इतका थंडेपणा आहे, तर येथील गुजराती लोकांनीं म्यु-निसिपल कमिटींत आपल्या हक्कांचें संगो-पन होण्याकरितां आपण निवडलेले—व यापुढें ज्यांस मतें देतील त्या मेंबर्सना ठीक बजावणी व ज्यास्त प्रकट उहापोह करावा लागेल, अशी स्थिति येईल असें मला वाटते. आशा आहे कीं आपण देखील अशा प्रसंगीं गुजराती लोकांच्या मदतीस याल.

आकोला } आपला
३० आक्टोबर १५ } कि. घ. मश्रूवाला.


वऱ्हाडसमाचार

मिति कार्तिक वद्य १ शके १८३७


## प्रस्तुत युद्धाचे उपकार.

युरोपांत चाललेल्या महायुद्धामुळें लोकांत बरीच अस्वस्थता उत्पन्न झाली आहे. लोकोपयोगी कामांवर सढळ हातानें रकमा मंजूर करण्याची सरकारास सवड राहिलेली नाहीं. राज्यकारभाराचा खर्च काटकसरीनें करूं लागण्याची अवश्यकता उत्पन्न झाली आहे. व्यापार मंदावला आहे. उद्योगधंदे बसले आहेत. यंत्रें वगैरे युरोपांतून येणारें सामान महाग झालें आहे. राजकीय चळवळींचें क्षेत्र संकुचित झालें आहे. युद्धाचे समाजावर कोणते परिणाम घडतील हें शहाण्या माणसांना ही निश्चितपणें सांगतां येत नसल्यामुळें सामाजिक प्रगतीचें धोरण ठरविणें कठीण झालें आहे. प्रस्तुत युद्धांत होणारा मनुष्य जातीचा संहार पाहून व विशेषतः सर्वांत अत्यंत सुधारलेलें राष्ट्र ह्मणून ज्याची कीर्ति सर्वतोमुखीं होती अशा जर्मनीकडून धर्म, नीति, सद्व्यवहार, वगैरे बाबींच्या संबंधाच्या नियमांचें पदोपदीं उल्लंघन घडत असलेलें पाहून सुधारणा व धर्मनीति यांचा खरोखर संबंध कितीसा आहे याविषयीं लोकांचीं मनें साशंक होऊं लागलीं आहेत. या सगळ्या गोष्टी लक्षांत घेतां मनुष्याची मानासिक प्रवृत्ति निराशेकडे धांव घेणें साहजिक आहे. पण हा वरवरचा विचार झाला. इतर राष्ट्रांसंबंधानें किंवा मनुष्यजातीसंबंधानें सामान्यतः न विचार करतां आपल्या हिंदुस्थानापुरताच विचार केला तर आह्मांला अशा निराशावादी लोकांचें खरोखर आश्चर्य वाटतें. कारण, ज्या गोष्टी त्यांना निराशा करणाऱ्या वाटतात, त्यांतच आह्मांला आमच्या भावी राष्ट्रोन्नतीच्या उदयाचीं खरीं खरीं चिन्हें दिसत आहेत. प्रस्तुत युद्धामुळें राजकीय चळवळींचें क्षेत्र मर्यादित झालें आहे ही गोष्ट खरी आहे. पण आपल्या राजकीय स्थितीचा शांतपणें विचार करणारास सध्याची स्तब्धता ही कांहीं अंशीं आमच्या देशाला अवश्य होती असें दिसून येईल. राजकीय उत्साहाचा फेस जिरून खऱ्या राजकीय उन्नतीचा मार्ग स्पष्टपणें दिसूं लागण्यास ह्या विश्रांतीचा काळ अवश्यच होता. आपल्या देशांत जहाल आणि मवाळ असे दोन मोठाले राजकीय तट आहेत. त्यांच्यांतली दुही मोडून दोघांना ही मान्य अशा प्रश्नांचीच चर्चा हातीं घेऊन त्यांवर आपला सगळा उत्साह खर्च करणें अधिक श्रेयस्कर होतें. ही दुही मोडण्याची गोष्ट कित्येकांना अशक्य वाटत होती. पण नागपूरच्या प्रांतिक परिषदेच्या उत्साही चालकांनीं ती शक्य आहे असें प्रत्यक्ष उदाहरणानें आतां दाखविलें आहे. दुही मोडून जुळलेला सांधा कितपत चिरस्थायी होईल हें आतांच सांगणें कठीण आहे. तथापि तो चिरस्थायी करण्याचे योग्य उपाय राष्ट्राचे पुढारी एकमतानें योजतील अशी आह्मांस पूर्ण खात्री आहे. प्रस्तुतच्या युद्धामुळें लोकांना आपल्या स्थितीचा विचार करण्यास जो शांततेचा वेळ मिळाला त्याचें हें एक दृश्य फळ आहे. दुसरें फळ ह्मणजे हिंदुस्थान व ब्रिटिशराज्य यांच्यांत पूर्वीपेक्षां ही निकट आत्मभाव उत्पन्न झाला आहे हें होय. आजपर्यंत कांग्रेस लोकांच्या तक्रारी विलायतच्या लोकांपुढें व सरकारपुढें मांडीत आली, त्यावरून हिंदुस्थानचे लोक हे निष्कारण कुरकुर करण्यांत तेवढे तरबेज आहेत, त्यांची राजनिष्ठा बोलण्यापुरती कायती आहे असा झालेला निष्कारण गैरसमज युद्धांत लढणाऱ्या हिंदी सैनिकांच्या रक्तानें दूर केला हा प्रस्तुत युद्धाचा हिंदुस्थानावर मोठा उपकारच समजला पाहिजे, आणि याचा परिणाम कोणत्याही रूपानें झाला तरी तो हिंदुस्थानास हितावहच होईल यांत शंका नाहीं. युद्धामुळें व्यापार मंदावला आहे खरा त्या बरोबर लोकांनीं फ्याशनचा त्याग साध्या राहणीनें कालक्रमणा करण्याच उचलल्यास आमच्या समाजाला व समृद्धि ही प्राप्त होण्याचा फार सं आहे. पुष्कळ अनवश्यक पण मोहक वस् जर्मनी व आस्ट्रिया मधून इकडे येत असत, आणि गरज नसतां ही त्या घेण्याची चटक आह्मां लोकांना लागलेली होती. ती चटक त्या वस्तु इकडे येईनाशा झाल्यापासून कमी झाली आहे हा ही कां लहानसान फायदा नाहीं. या वस्तूवांचून आमच्या लोकांचें अडलेंच असलें तर त्या इकडे उत्पन्न करण्याकडे लोकांची साहजिक प्रवृत्ति होईल, आणि अडलें नसलें तर चैनबाजीची दुष्ट संवय तरी दूर होईल. उद्योग धंदे बसले हें ह्मणणें सर्वांशीं खरें नाहीं. जे लोक जर्मन व आस्ट्रियन कारखानेवाल्यांचे एजंट किंवा दलाल होते त्यांचे धद बसले ही गोष्ट खरी आहे. पण या अल्पसंख्यक लोकांच्या नुकसानीपासून आमच्या लोकांनीं करून घेतल्यास मोठा फायदा होण्याचा संभव आहे. जो माल पूर्वी जर्मनीतून किंवा आस्ट्रियांतून इकडे येत असे तो येथल्या येथें तयार झाल्यास विकत घेणारें गिऱ्हाइक आयतें

फॉरेस्ट
नेयरिंग
गत
करितां
न
कुबी
न?
क्या
शासी
हानि
पण
सर्वच
पल्या
या
प्रिय
मृत
हिंदु-
ती
रोध
होती.
क
त.
नानें

तयार आहे. फक्त धाडशी भांडवलवाले आणि कुशल व कल्पक कारखान्याचे व्यवस्थापक यांची वाण आहे. ज्यांच्या अंगीं हे गुण असतील त्यांना पुढें येऊन आपले गुण प्रकट करण्यास हवें तेवढें क्षेत्र झालें आहे. आमचे लेकांनीं यावेळीं माघार घेतली व परमेश्वरानें आयत्या आणून दिलेल्या सोन्यासारख्या संधीचा फायदा करून घेतला नाहीं, तर त्यांत आमच्याच लोकांकडे बोल येईल, आणि आमच्या लेकांची कर्तृत्वशून्यता जगाला दिसेल. सामाजिक बाबतींत हाच नियम लावतां येईल. आमचे हिंदी शिपाई राजनिष्ठेनें प्रेरित होऊन देशकार्यासाठीं व राजकार्यासाठीं सात समुद्र ओलांडून गेल्याबद्दल व तेथें भक्ष्याभक्ष्याचे नियम न पाळल्याबद्दल आमच्या समाजानें ते परत आल्यावर जर त्यांचे मागें प्रायश्चित्ताचें लचांड लावलें तर त्यांत त्या समाजाचाच मूर्खपणाँ दिसून येईल. असा मूर्खपणा करण्याइतका मूढ आमचा समाज आतां राहिला नाहीं हें परत आलेल्या शिपायांशीं त्यांनीं ठेवलेल्या वर्तनावरून उघड दिसत आहे. ही स्थिति निराशाजनक कोणास वाटत असेल तर खुशाल वाटो, आह्मांला तरी ती अत्यंत प्रगातिकतेची निदर्शक आणि ह्मणून अभिनंदनीय वाटते. अशा प्रागतिकत्वाच्या प्रवृत्तीचा फायदा घेऊन सरकारला व समाज सुधारकांना पुष्कळ सुधारणेच्या गोष्टी यावेळीं समाजांत प्रविष्ट करतां येतील व ते ही आलेली संधी हातची दवडणार नाहींत अशी आह्मी आशा करतों. आतां सुधारणा आणि नीति यांचा अक्षय संबंध आहे काय ? या प्रश्नाचा विचार करणें नव्हर आहे. त्यापूर्वीं सुधारणेचा पाया कोणता आहे या गोष्टीचा विचार करणें नव्हर आहे. तो केला ह्मणजे जर्मनी संबधानें जें गूढ कित्येकांस पडलें आहे तें आपोआप उलगडेल. कोणतीही सुधारणा आध्यात्मिकतेच्या आधाराशिवाय चिरस्थायी होऊं शकत नाहीं. आध्यात्मिकतेचें बळ किती मोठें असतें याचीं उदाहरणें इंग्लंडच्या धार्मिक सुधारणेच्या इतिहासांत भरपूर सांपडतील. अंगावर शहारा आणण्यासारखे धर्मछळ होत असतां आणि धर्मकिंवा प्राण यांतून एकाची निवड करा ह्मणून छळवादी लिहून सांगत असतां अनेक धर्मप्रचारकांनीं प्राणत्याग पतकरून जिवंतपणीं हूं कां चूं न करतां स्वतःस जाळून घेतलें, पण धर्ममतांचा त्याग केला नाहीं. हें येवढे धैर्य, येवढें मानासिक बळ त्यांचे अंगीं कोठून आलें ? हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे. पण या प्रश्नाचें उत्तर निर्विकार दृष्टीनें विचार करणारास सहज देतां येईल. हें आध्यात्मिकतेचें बळ होतें. जर्मन लोकांची सुधारणा ही आध्यात्मिकतेच्या भक्कम पायावर उभारलेली नव्हती. केवळ भौतिक उन्नत्तीच्या पायावर होती. अर्थात्च ती केवळ दिखाऊ होती; आणि प्रसंग येतांच तिनें आपलें खरें राक्षसी स्वरूप प्रगट केलें. प्रस्तुत युद्धानें जर्मनीच्या दांभिकतेचा स्फोट करून हीच गोष्ट प्रस्थापित केली आहे, आणि ती भौतिक उन्नतीचे गोडवे गाणाऱ्या आमच्यांतल्या बरेच लोकांचे चांगले डोळे उघडील असें आह्मांस वाटतें. सारांश, प्रस्तुतच्या युद्धापासून आमच्या लोकांना शिकण्यासारख्या पुष्कळ गोष्टी आहेत. मात्र वरवर विचार करण्याचें सोडून खोल शिरलें पाहिजे, आणि तसें शिरून सद्यःस्थितीचा विचार केल्यास व प्रस्तुत युद्धापासून शिकावयाचें तें शिकल्यास आह्मांस आमच्या चिरस्थायी उन्नत्तीचा मार्ग अगदीं स्पष्टपणें दिसल्यावांचून राहणार नाहीं. आमच्या लोकांच्या दृष्टीवर आलेलें निराशेचें पटल दूर होईल, आणि किंकर्तव्यतामूढ अशा स्थितींत आमचे लोक भांबावलेले दिसत आहेत, त्या स्थितींतून त्यांची सुटका होऊन ते सरळ व उन्नतीच्या मार्गाला लागतील. हा सन्मार्ग दाखविणारा गुरु ह्मणजे सध्याचें युद्ध होय. ह्मणून त्याचे मानावे तेवढे उपकार थोडेच झाले पाहिजेत.

## नमुनेदार संस्था·

सध्याचा काळ संघशक्तीच्या जोरावर देशाची उन्नति करून घेण्याचा आहे. ही गोष्ट तोंडानें बोलणारे लोक पुष्कळ आहेत; पण प्रत्यक्ष एखादी संस्था स्थापून तिच्या द्वारें उपयुक्त कार्य करणाऱ्या संस्था साऱ्या हिंदुस्थानांत हाताच्या बोटांवर तरी मोजण्याइतक्या भरतील कीं नाहीं याची शंका आहे. ह्मणूनच अशा संस्थांच्या संख्येंत एका संस्थेची जरी भर पडली तरी आह्मांला तिचें अभिनंदन करावेंसें वाटतें. राजकीय बाबतींत हिंदुस्थानच्या लोकांस उन्नतीच्या मार्गानें जपून नेणारी अशी बहुतेक एकच मोठी संस्था ह्मणजे कांग्रेस ही आहे. पण तिच्या हातून ही सत वर्षभर असें काम होत नाहीं. शिवाय तिच्यांत पक्षभेदामुळें झालेले कलह व विभक्तपणामुळें होणारे धिडवडे यामुळें बराच कमकुवतपणा आलेला आहे. सामाजिक सुधारणेच्या बाबतींत सोशल कान्फरन्स ही नांवाला मात्र वर्षांतून एकदां भरत असते. परंतु निवळ व्याख्यानापलीकडे सामाजिक सुधारणेचें कांहीं कार्य तिच्या हातून कितीसें घडतें तें तिचें तिला ठाऊक. औद्योगिक परिषदेची, साहित्यपरिषदेची व एकेश्वरी धर्मपरिषदेची स्थिति जवळ जवळ तशीच आहे. पण या मध्यवर्ती संस्था जरी कांहीं कार्य करण्यास स्वतः अक्षम असल्या, तरी त्यांच्या शाखा, उपशाखांना जीवनरस पोचवून त्यांना जोरदार बनविण्याचें एक महत्कृत्य त्या करीत आहेत यांत शंका नाहीं. उदाहरणार्थ राजकीय बाबतींत प्रेसिडेन्सी असोसिएशन, व कलकत्त्याची ब्रिटिश इंडिया असोसिएशन, सामाजिक बाबतींत मुंबईचें आर्यन ब्रदरहुड, व मद्रासची सोशल रिफॉर्म असोसिएशन, सोशल सर्व्हिस-लीग, साहित्यविषयक संस्थांपैकीं कलकत्त्याची बंगीय साहित्य परिषद, वरेंद्र रिसर्च सोसायटी व पुण्याचें भारत इतिहाससंशोधक मंडळ, वगैरे संस्था प्रशंसनीय कामें करीत आहेत. पुण्याची तुकाराम सोसायटी ही मुकाट्यानें पण नेटानें आज कित्येक वर्षे स्वीकृत कार्य आस्थेनें करीत आहे. या संस्थेसारख्या एकेका विषयाला वाहिलेल्या संस्थांची सध्याचे काळीं अत्यंत अवश्यकता आहे. आरोग्य, अर्थशास्त्राचें अध्ययन, नगररचना, रेल्वेची व्यवस्था, स्थानिक स्वराज्यसबंतींत सुधारणा, लोकशिक्षण, ग्रंथालयांची वृद्धि वगैरे शेकडों विषय आहेत कीं ज्या विषयासाठीं प्रत्येक प्रांतांत एकेक तरी संस्था अवश्य पाहिजे आहे. अलीकडे हिंदुस्थानविषयक अर्थशास्त्राचा उदय होऊं लागला आहे. अशा वेळीं त्या शास्त्राच्या रचनेस साह्यभूत अशी सामुग्री गोळा करण्याची खटपट करणाऱ्या संस्थेची मोठी उणीव भासत आहे. मुंबईकडे ना. गोखल्यांच्या सर्वंटस् ऑफ इंडिया सोसायटीनें लोकांच्या स्थिती संबंधाची माहिती गोळा करण्याची खटपट कांहीं वर्षांपूर्वीं चालविली होती असें कळतें. पण ती माहिती त्या संस्थेच्या दप्तरांतच पडून राहण्यांत काय अर्थ आहे! ती प्रसिद्ध होऊन एखाद्या वजनदार पंडितांच्या संस्थेकडून तिची चर्चा होऊन तिच्यापासून कांहीं तत्त्वानिष्पत्ति व्हावयास पाहिजे. हेंच कार्य करण्याच्या उद्देशानें पाटणा येथें चाणक्य सोसायटी स्थापन झाली आहे व तिनें लोकांच्या गृहस्थितीविषयीं सप्रमाण माहिती गोळा केली आहे. ही माहिती अपूर्व आहे असें प्रशंसापत्र तिनें अर्थशास्त्राचे पंडित प्रो. जेव्हॉन्स यांचेकडून मिळविलें असल्याचें कळतें. अशा नमुनेदार संस्थांची संख्या जितकी वाढेल तितकी हिंदुस्थानची प्रगति झपाट्यानें होईल.

## लोकांच्या हक्काची पीछेहाट.

हिंदुस्थानांतल्या लोकांना ज्युरीचा हक्क देण्याला अधिकारी वर्ग फारसा अनुकूळ कधींच नव्हता. असा हक्क त्यांना देणें ह्मणजे लहान मुलांच्या हातीं कोलीत देण्यासारखें भयावह आहे असें त्यांचें मत दिसतें. तथापि विलायतेंतील लोकांचा आग्रह पडल्यामुळें हिंदुस्थानाला तो हक्क पुष्कळ वर्षांपूर्वीं मिळाला, व जरी क्वचित् एखादे स्थळीं किंवा काळीं या हक्काचा दुरुपयोग लोकांकडून झाला असला, तरी एकंदरीनें लोक या हक्कास अपात्र आहेत असें सप्रमाण ठरविण्या इतका किंवा तो हक्क काढून घेण्याची शिफारस करण्याइतका मजबूत पुरावा सरकारपाशीं खास नाहीं. असें असतां एखाद्या जिल्ह्याचा किंवा गांवाचा तो हक्क काढून घेण्यास सरकारी अधिकारी कां टपलेले असतात तें सांगणें फार कठीण आहे. मुंबई सरकारनें बेळगांव जिल्ह्याचा हा हक्क नुकताच काढून घेतल्याचें जाहिर झालें आहे. सरकारला हें पिछेहाटीचें काम करण्यास लावण्यासारखा कांहीं प्रकार तेथें घडला असेल, आह्मी नाहीं ह्मणत नाहीं. पण सध्या हिंदुस्थान देश हक्कांच्या संरक्षणाचे बाबतींत अध्ययनाचे मार्गांत आहे. या स्थितींत त्याचे हातून क्वचित् प्रसंगीं चुका घडणारच. त्या चुका होऊं न देण्यास काय केलें पाहिजे हें प्रेमळ शद्बांनीं सांगणें सरकारासारख्या गुरूचें काम आहे. तें न करतां एकदम तो हक्क काढून घेणें ह्मणजे धुळाक्षरें शिकणाऱ्या लहान मुलानें म च्या ऐवजीं न काढला या चुकीबद्दल त्याच्या हातांतली स्लेटपाटी काढून घेऊन त्याला वर्गाबाहेर हाकून देणाऱ्या तापट व चिडखोर तात्यापंतोजींच्या कृत्यासारखें गर्ह्य आहे. असा पंतोजी त्या मुलाचा शिकण्याचा हुरूप तर नष्ट करतोच, पण त्याबरोबर शिक्षकाच्या कामाबद्दलची स्वतःची अपात्रताही व्यक्त करीत असतो. लोकांना एकेक हक्क संपादन करण्याला केवढी उरस्फोड व यातायात करावी लागते याची साक्ष इंग्लंडचा इतिहास व आपले देशांत कांग्रेसचा इतिहास उत्तम प्रकारें देत आहे. अशा प्रकारें महत् प्रयासानें लोकांनीं संपादलेले हक्क सरकारनें टाकाच्या एका फटकाऱ्या सरशीं काढून घ्यावे हें सरकारला ही विशेष भूषणास्पद नाहीं हें सांगावयास नकोच.

## इंडियन पोलीस सर्विस परीक्षा.

'ह्मातारी गेल्याचें दुःख नाहीं, पण काळ सोकावतो' अशी मराठी भाषेंत ह्मण आहे तिचें प्रत्यंतर राजकीय बाबतींत आह्मां हिंदी लोकांना वरचेवर येत असतें. प्रस्तुत युद्धामुळें इंडियन सिव्हिलसर्विसची परीक्षा दोन वर्षें बंद ठेवण्याबद्दलचें बिल लार्ड इसालिंगटन यांनीं लार्डस सभेपुढें आणिलें. तेव्हां साऱ्या हिंदुस्थानच्या लोकांनीं त्याविरुद्ध जोरानें लोकमत प्रकट केलें हें पाहून एक इंग्रज आह्मांस ह्मणाला कीं 'तुह्मी हिंदुस्थानचे लोक मोठे विचित्र दिसतां. सिव्हिलसर्विसच्या परीक्षेंत तुमचे लोक दरसाल अर्धा डझन सुद्धां पास होत नाहींत, तेव्हां दोन वर्षांत तुमच्या डझनभर लोकांना मोठाल्या जागा मिळाल्या नाहींत ह्मणून त्याबद्दल येवढें अकांडतांडव कशाला करावयास पाहिजे? ' आह्मी यावर त्या सद्गृहस्थाला 'ह्मातारी मेल्याचें दुःख नाहीं, पण काळ सोकावतो ' या ह्मणीच्या रूपानें उत्तर दिलें. त्यानें त्याचें समाधान झालें नाहीं, पण त्यानंतर ज्या एकेक गोष्टी घडत आहेत त्यांवरून आमच्या उत्तराची सत्यता त्याला आतां तरी पटेल अशी आमची खात्री आहे. सिव्हिल सर्विस बिलाची चर्चा सुरु आहे तोंच त्याच्या मागोमाग इंडियन पोलीस सर्व्हिसची परीक्षा तूर्त तहकूब ठेवण्यांत आली आहे असें हिंदुस्थानच्या स्टेटसेक्रेटरी साहेबाकडून जाहिर करण्यांत आलें आहे! हळूं हळूं फॉरेस्ट सर्व्हिस, एज्युकेशन सर्व्हिस, इंजिनियरिंग सर्व्हिस वगैरे सर्व सर्व्हिसांची तीच गत व्हावयाची. आणि आज दोन वर्षांकरितां केलेली तहकुबी हिंदुस्थानानें हूं कां चूं न करतां मान्य केली, तर उद्यांही तहकुबी कायमची होऊन बसणार नाहीं कशावरून?

## सिंहवृत्ति.

कै. गोखले यांच्या मागोमाग इतक्या अल्पकाळांत सर फिरोजशहा कैलासवासी झाले या सारखी राष्ट्रांतील तात्कालीक हानि कोणतीच अधीक असूं शकणार नाहीं. पण आमच्यामतें हे दोघेच काय पण सर्वच थोर मुत्सद्दी, कवी किंवा तत्ववेत्ते आपल्या सोज्वल कितीनें अजरामर असतात. या संत मंडळीची कितीं त्यांच्या त्यांच्या प्रिय राष्ट्रांवर आपापल्या कैलासामधून विचारामृत वर्षीतच असते. सर फेरोजशहा यांस हिंदुस्थानचा सिंह असे ह्मणतात. त्यांची ती सिंहवृत्ती ह्मणजे राष्ट्राच्या उन्नतीला प्रतीरोध करणाऱ्या हत्तीची गंडस्थळें फोडणारी होती. सर फेरोजशहा सारखे सर्वच मोठे लोक सजीव हत्तीशीं सिंहाप्रमाणें युद्ध करितात. ही सिंहवृत्ती लोक ज्या ज्या मानानें

उचलतील त्या त्या मानानें सर फेरोजशहा सारखे लोक आपल्या देशांत अमर होऊन राहिले याची खरी साक्ष जगास पटवून देतील. या सिंहवृत्तीचा आह्मी एवढा जयघोष करीत आहोत, कां कीं तिच्या स्वीकारानें आपल्या मधील गृध्रवृत्ति फार त्वरित विलयास जाईल. गृध्र प्रेतावर झडप घालतात, आणि त्याच्या सडक्या रक्त मांसावर आकंठ तृप्त होतात. पण त्याच्या उलट सिंह जिवंत मदोन्मत्त हत्तींशीं झुंजतात. आणि त्यांच्या मस्तीतील मुक्ताफळें सेवीत असतात तद्वतच ज्या लोकांच्या नष्ट गोष्टीविषयीं रडकथा चालतात, ज्यांची दृष्टी दोषपुरानें क्षय पावते आणि त्यामुळें सर्व जग अरण्य वाटून रुदन करीत आपले हातपाय कापून बसतात त्या लोकांस आह्मी गृध्र वृत्तीचे समजतों. आणि प्रत्येक राष्ट्रांतील गृध्र मंडळीच राष्ट्राच्या आगामी आपत्कालीं प्रबल होत असतात. ही हिंदुस्थानांतील प्रबल अवस्था कै. फेरोजशहासारखे सिंह यांनीं मोडकळीस आणली हीच आमच्यां राष्ट्राच्या प्रगतीची मुख्य लक्षणें होत फेरोजशहासारखे शतशः सिंह हिंदुस्थानच्या दशदिशा उज्वलित करण्यास पाहिजे आहेत. आणि हे सिंह आपापल्या परीनें देशकार्याला सरसावले आहेत ही आनंदाची गोष्ट यंदाच्या राष्ट्रीय सभेच्या वेळीं आपल्या सिंहासनावरून सिंहातले सिंह रा. सत्येंद्रसिंह हे जगाच्या निदर्शनास आणतील.

---

## मध्यप्रांतीय प्रांतिक परिषद्.

पूर्व संकेताप्रमाणें गेल्या मंगळवारीं बुधवारीं व गुरुवारीं या चवथ्या प्रांतिक परिषदेचा समारंभ मोठा वर्णनीय झाला. अपूर्व उत्साह तिन्ही दिवस जागृत होता. व सर्वांचे एकदिलीचे विचार निरानिराळ्या ठरावांतून भाषणद्वारा व्यक्त होत होते. एकंदर १०९९ प्रतिनिधी जमले होते, व त्या शिवाय उत्सुक प्रेक्षकगणही आपल्या प्रसन्न मुद्रेनें सभाकार्यास मदत करीत असे. धनतोली येथील पार्कमध्यें उभारलेल्या भव्य व मनोवेधक मंडपांत तीन दिवस विलक्षण श्री नांदत होती. मंडपाच्या दर्शनी कमानीवर व त्याच प्रमाणें मंडपाच्या मुख्य दर्शनीभागीं वस्तुस्थितीचे निदर्शक असे चित्रपट लाविले होते. इतिहास प्रसिद्ध राजधानीला साजेसा सर्व थाट होता. मंगळवारीं तीन वाजण्याच्या सुमारास आनंदाच्या टाळ्या व वंदेमातरम् च्या जयघोषांत मुख्य मुख्य मंडळी येतांच आरंभीं स्वागत कमिटीचे अध्यक्ष ना. सर गंगाधरराव चिटनवीस यांनीं आपले इंग्रजी स्वागतपर भाषण वाचून दाखविलें. या भाषणाची मांडणी इतकी उत्कृष्ट साधली आहे कीं, हें भाषण ह्मणजे हिंदुस्थानच्या राजकीय अंतरंगाचें सुंदर चित्रच होय. सम्राट् जॉर्ज बादशहा फ्रान्सच्या रणांगणावर आपल्या सैनिकाची भेट घेत असतांना त्यांस घोड्याचा अपघात झाला पण त्यांतून त्यांची प्रकृती भराभर सुधरत आहे, याबद्दल आनंद प्रदार्शित करून अशा राजगुणसंपन्न बादशहाला दिर्घायु व विजयश्री लाभो, ह्मणून ईश्वराची प्रार्थना केली. भाषणाच्या मुख्य विषयाकडे येण्यापूर्वी कै. गोखले कॉटन व मेथा आणि तसेच नागपूरचे कै. बापुराव दादा यांच्या मृत्यू बद्दल खेद प्रदर्शन करून नंतर युरोपखंडभर पसरलेल्या युद्धप्रसंगीं हिंदुस्थान देशाला साम्राज्याचा एक घटक या नात्यानें आपलें जबाबदारीचें धोरण राखावें लागणार आहे. तेव्हां वादविषयीभूत असे विषय सभेच्या कार्यक्रमांतून वगळून फक्त प्रांतिक गरजा व अडचणी यांचाच विचार करण्याचें धोरण दर्शवून या परिषदेच्याद्वारें आह्मीं हें मुख्यतः व्यक्त करूं इच्छितों कीं, चालू लढाईत आह्मी सर्वस्व राजपदीं अर्पण करण्यास तयार आहों हें स्पष्टतेनें पुनःपुनः गर्जून सांगत आहों. लार्ड हार्डिंज इंडियाला साम्राज्याचा खरा मित्र समजतात. तेव्हां या मित्रत्वाच्या वाट्याला पुरे येणारें कार्य आह्मांकडे सोपाविलें जात नाहीं ही आमची मुख्य तक्रार आहे. आपले राजकीय ध्येय सभेपुढें मांडतांना सर चिटनविस यांनीं आपल्या ध्येयासंबंधानें सरकारचा दृष्टीकोन कसा अनुकूळ होत चालला आहे, हें सांगून ता. २६ आक्टोबर रोजीं स्टेट सेक्रेटरी रा. चेंबरलेन यांनीं आपल्या भाषणांत वर्तविलेल्या हिंदुस्थानच्या सुंदर भविष्याला उद्देशून ते बोलले कीं:

"बाबांनो, तुह्मी आज अशावेळीं हिंदुस्थानांत जात अहा कीं, सर्व साम्राज्याला हिंदुस्थानाविषयीं प्रेम वाटूं लागलें आहे. आणि ज्या ज्या नवीन राजकीय संस्था आपण हिंदुस्थानांत निर्माण केल्या आहेत, त्यांचा त्यांचा उत्कर्ष होण्याची वेळ आली आहे. आतां यापुढें हिंदुस्थानांत नुसती फर्माने सोडून चालणार नाहीं! दिवसेंदिवस लोकांची मनधरणीच करावी लागेल."

आमच्या राजनिष्ठेचा बोलबाला सर्वत्र होत आहे. गेल्या थोड्याशा महिन्यांत हिंदुस्थानच्या राजकीय ध्येयाचा इतका उत्कर्ष झाला आहे कीं, आतां साम्राज्यांत सर्वत्र 'हिंदुस्थानला स्वराज्य दिलें पाहिजे' अशी भाषा ऐकूं येऊं लागली आहे! वसाहतींत देखील पूर्वींचा वर्णभेदाचा मनू पालटून जाऊन चहूंकडे हिंदुस्थानच्या गुणाचें कौतुकच होत आहे. परवां वरिष्ठ कायदेकौन्सिलांत साम्राज्य परिषदेंत प्रतिनिधि पाठविण्याचा ठराव पास झाला, त्याबद्दल सुद्धां विलायतेंत आणि वसाहतींत मोठी प्रशंसाच झाली. केवळ त्या बाबतींतच आह्मांस यश मिळेल असें नाहीं. तर प्रत्येक बाबतींत हळुहळू हिंदुस्थानचा दर्जा अधिक विश्वासाचा व समानतेचा होत जाणार आहे. परवां नुकतेच ना. व्हाइसरायांचें सिमला येथें सिव्हिल सर्व्हिसपुढें अत्यंत दूरदृष्टीचें, उदार अंतःकरणाचें व सद्बुद्धि प्रेरित असें भाषण झालें. त्या थोर मुत्सद्यानें जे विचार प्रदर्शित केले ते ऐकावयास जर लॉर्ड मेकॉले जिवंत असते, तर त्यांना सुद्धां आनंदाच्या गुदगुल्या झाल्या असत्या! लॉर्ड हार्डिंज ह्मणाले:—

"इंग्लंडनें या देशांत पाश्चात्य संस्कृति व सुधारणा यांच्या विषयीं आवड उत्पन्न केली आहे; स्वतंत्रता आणि स्वाभिमान यांचीं ध्येयें लोकांपुढें ठेवलीं आहेत. आतां इंग्लंडला केवळ हिंदुस्थानच्या सांपात्तिक भरभराटीकडे लक्ष पुरवून चालावयाचें नाहीं. ज्या उच्च महत्वाकांक्षांचें बीज आपण पेरलें, त्यांचा परिपोष आतां करावा लागेल. आजपर्यंत होऊन गेलेल्या इंग्रज अधिकाऱ्यांनीं उच्च ध्येयें ठेवून मोठमोठ्या कामगिऱ्या केल्या. परंतु यापुढें त्यांना जी कामगिरी करावयाची आहे ती त्याहूनही फार मोठी आहे. हिंदुस्थानच्या उत्कर्षाचीं पावलें प्रगतीच्या मार्गावर निश्चयानें व बिनधोक पडतील, ही कामगिरी त्यांना बजवावयाची आहे. तुह्मांला यापुढें हिंदुस्थानचे नेते, तत्ववेत्ते, व स्नेही बनावें लागेल. आणि ही कामगिरी कांहीं लहानसहान नव्हे. ती बजावण्यासाठीं तुह्मांला विस्तृत कल्पनाशक्ति आणि उदार अंःतकरण ठेवावें लागेल. आणि स्वार्थत्यागही करावा लागेल. कारण, आजपर्यंत ने जे अधिकार केवळ तुमच्याच हातांत होते त्यांतलें कित्येक तुह्माला आस्तेआस्ते लोकांच्या हवाली करावे लागतील. इंग्लंडचा आजपर्यंतचा पराक्रम हा मोठा आहे खरा, पण लोकांच्या राजकीय आकांक्षा परिपूर्ण करण्याचें या पुढील काम फारच उज्वल व उदात्त आहे. या सर्व आकांक्षा आजच पूर्ण होतील, असें नाहीं तरी त्या आज नाहीं उद्यां पूर्ण झाल्याच पाहिजेत या गोष्टीकडे कोणाही ब्रिटिश अधिकाऱ्यानें दुर्लक्ष करून चालावयाचें नाहीं. कारण या आकांक्षाची परिपूर्णता झाली, तरच ब्रिटिश लोकांची इभ्रत व चोख व्यवस्था हीं जगास कळून येणार आहेत."

अशा प्रकारें हिंदुस्थानचा भविष्यकाल उज्वल दिसत आहे. पूर्व क्षितिजावर उषःकालची नवीन प्रभा चमकूं लागली आहे. परंतु आपण एक गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे कीं, अधिकाऱ्यांचा आह्मांस सहाय्य करण्याचा हा निश्चय जसजसा जास्त, तसतशी आपल्यावरील जबाबदारीही जास्त. लोक आणि सरकार यांचें कार्य भिन्नभिन्न नाहीं. यामुळें या दोन्ही पक्षांत मोठा मतभेद उत्पन्न होईल, असें वाटत नाहीं. उभयतांचें ध्येयही एकच. फार झालें तर एका पक्षाची इच्छा जलद पल्ला गांठण्याची असेल, इतकेंच. ह्मणून आपण सारासार विचार, परस्परसहकारिता व सौम्यपणा यांचा अंगीकार करून राष्ट्रोन्नतीच्या कामीं सरकारास मदत करावी. अर्थातच टीकाप्रतिटीका व विरोध हीं कांहीं निरुपयोगी नाहींत. लोक-प्रतिनिधि नियंत्रित संस्थांत तर त्यांचा मोठाच उपयोग आहे. परंतु सद्यःस्थितींत सरकारच्या सद्बुद्धी विषयीं ज्या अर्थी आपली खात्री पटली आहे, त्या अर्थी सरकारला मदत करण्याचें धोरण हेंच श्रेयस्कर आहे. उभयतांमध्यें एकमतानें व एक विचारानें काम सुरू झाल्यास आपलें उद्दिष्ट आपणांस खात्रीनें साध्य होईल. ह्मणून आपसांतलीं सर्व भांडणें मिटवून आपण सरकारला मदत करण्याची एकच चळवळ सध्यां चालू ठेवावी. संयुक्त राष्ट्रांच्या शस्त्रास्त्रांना यश मिळून महायुद्ध संपलें ह्मणजे आपण सनदशीर चळवळीचें कार्य अधिक नेटानें सुरू करूं व त्यांत आपणांस बहुधा यशही मिळेल. मग चोहोंकडे आपल्य हक्काविषयीं सहानुभूतीपूर्ण विचार होईल आणि आपणाला सर्वांचा पाठिंबा मिळेल. विजयाच्या जयजयकारांत हिंदुस्थान अधिक स्वतंत्र व अधिक स्वावलंबी होऊन जगांतील थोर राष्ट्रांत प्रविष्ठ होईल, अशी मला आशा आहे. (टाळ्या)

या नंतर डॉ. गौर यांनीं ना. जोशी, ना. मुधोळकर, रा. तांबे, इत्यादी लोकांचे, अपरिहार्य कारणामुळें झालेल्या गैरहजरीबद्दल दिलगिरी प्रदर्शक टेलिग्राम वाचून दाखविले. नंतर ना. दादाभाई यांनीं थोड्यांत पण वक्तृत्वपूर्ण इंग्रजी भाषणानें अध्यक्षांचें गुणानुवाद गावून सभाजनांस त्यांची ओळख करून दिली. व या सालच्या परिषदेला अध्यक्षत्वाला डॉ. शुक्ल यांच्यापेक्षां लायक दुसरा कोणीहि मिळण्यासारखा नसल्यामुळें त्यांसच हे अध्यक्षस्थान द्यावें, अशी सूचना केली. सूचनेस अनुमोदन रा. खापर्डे यांनीं दिलें; ते ह्मणाले पहिलि पारिषद नागपूर मुक्कामीं भरली होती, सभा अल्प प्रमाणावर असल्यामुळें अध्यक्षस्थानही एका गारिबशा माणसाकडे (स्वतःकडे) होते. दुसरी परिषद् जबलपूर सारख्या मोठ्या शहरीं असून मोठ्या प्रमाणावर होती, व तिचें अध्यक्षत्वही मोठ्या माणसाकडे (सर गंगाधर चिटनवीस) होते; तिसरी परिषद् रायपूर मुक्कामीं भरली; सभेस अतिशय रंग आल होता, व अध्यक्षही अनुरूपच ह्मणजे (रा. रंगनाथ नरसिंह मुधोळकर हे होते.) या वर्षी यूरोपखंडांत चाललेल्या महायुद्धाच्या अस्मानी सुलतानीमुळें व परिषदेस स्वीकाराव्या लागणाऱ्या विशिष्ट धोरणामुळें रा. ब. विष्णू दत्त शुक्ल हेच अध्यक्ष योग्य आहेत. दोन्ही पक्षांत समेट होऊं शकणार नाहीं असें ह्मणतात; पण दोन्ही—पक्षांत वाद इतके झाले आहेत कीं **'तप्तेन तप्तमयसा घटनाय योग्यम्'** या उक्ती प्रमाणें त्या दोन्ही पक्षांत समेट ह्मणजे घटना होण्याची ही वेळ आलेली आहे. तेव्हां रा. बिशन दत्त शुक्ल या योग्य गृहस्थास अध्यक्षस्थान देण्याच्या सूचनेस मी अनुमोदन देतों. अशा प्रकारचें विनोदपूर्ण भाषण झालें. कै. फेरोजशहा मेथा यांच्या मृत्युबद्दल दुःख प्रदर्शक ठरावासही अनुमोदन देतांना रा. खापर्डे यांनीं सुश्राव्य भाषण केलें. अपूर्ण

---

## युद्धसमाचार.

गेल्या महिन्या दीड महिन्यांत इंग्लंडवर आलेलें निराशेचें वावटळ सुदैवानें पार नाहींसें होत चाललें आहे ही आनंदाची गोष्ट प्रथम सांगण्यासारखी आहे. सर्वियानें विलक्षण धैर्यानें टिकाव धरला आहे. जर्मनी, आस्ट्रिया व बल्गेरिया या तिघांच्या मगरमिठींतून सुटका होण्यास सर्व्हियाला पुष्कळ कालावधि लागेल ही गोष्ट खरी आहे तरी फ्रेंचांनीं तिकडे जयावर जय मिळवून शत्रूंना हताश करण्यास प्रारंभ केला आहे. सर्वियन लोकांशीं फ्रेंच लोकांचा व्यवहार सुरू झाला त्यामुळें सर्वियाच्या जिवांत जीव आला आहे. उत्तरेकडे रिगाच्या बाजूला रशियानें जर्मनीला बरेंच मागें रेटीत नेलें आहे. ग्यालीपोलींत उभय पक्ष आपापल्या सैन्याची मजबुती करीत आहेत. इटली स्वतःपुरतें उत्तम कार्य करीत आहे, तथापि त्याच्याकडून सर्बिया व मित्र राष्ट्रें यांना व्हावी तशी मदत होत नाहीं अशी कुरकुर आहे. नाहीं ह्मणावयाला एक इटालियन क्रूझरनें डीडीगाचवर तोफांचा भाडिमार सुरू करून

आपण उदासीन नाहीं या गोष्टींचें प्रत्यंतर दिलें आहे. जर्मनीनें धर्मभावनेला खुंटीवर अडकावून ठेवून अत्याचाराचा आपला क्रम चालू ठेविला आहे. अमेरिकेंत गुप्त कट करून तेथील शस्त्रागारांना व बोटींना आग लावण्याचा विचार करणाऱ्या गुप्त मंडळ्यांचें आस्तित्व तेथील सरकारचे नजरेस येऊं लागलें आहे. पाश्चिमेकडील रणक्षेत्रांत विशेषशी चळवळ दिसत नाहीं, व एकाअर्थी तें बरें आहे कारण त्यामुळें ब्रिटिश मुत्सद्यांना अंतर्व्यवस्थेंत सुधारणा करण्यास अवकाश मिळाला आहे. मुख्य प्रधान मि. ॲस्किथ यांनीं क्याबिनेटचा विस्तार लहान करण्याचा विचार केला आहे. या संकुचित प्रधान मंडळांत आपणांस घेतलें नाहीं ह्मणून मि. चर्चिल यांस राग येऊन त्यांनीं आपल्या प्रधानपदाचा राजीनामा दिला आहे. व ते आतां एका सामान्य शिपायाप्रमाणें हातांत बंदूक घेऊन रणक्षेत्रावर जावयाचे आहेत. लॉर्ड किचनेर हे बाल्कनच्या रणक्षेत्राकडे पाहणी करण्यासाठीं स्वतः गेले आहेत. कान आणि डोळे यांच्यांतलें अंतर अशा रीतीनें काढून टाकिल्यानंतर युद्धासंबंधाच्या त्यांच्या योजनेंत इष्ट अशी सुधारणा करण्यास तें चुकावयाचे नाहींत.

---

## वऱ्हाडवृत्त.

**हवामान—** मध्यंतरीं अभ्रें येऊन गेल्या शनिवारीं अर्ध्या इंचावर पाऊस पडून हवेंत मोठीच चलबिचल झाली आहे. पण पुनः हिंवाळ्याचा सुखकर अंमल जोरानें लवकरच सुरू होईल. या पावसानें खरीपाचें नुकसान व रब्बीचा फायदा अशी वजावट केली आहे.

प्लेग— आकोल्याचा प्लेग अगदीं शमला असून कांहीं शिलक राहिलेल्या भागांत तुरळक ३-४ मृत्यू होतात. बाकी आकोला तालुक्यांतील १७ खेडीं प्लेगानें व्याप्त आहेत. तसेंच मुर्तिजापूर तालुक्यांतील ५ गांवीं, बाळापुर तालुक्यांतील ३ गांवीं प्लेग सुरू आहे. एकंदर मृत्यूची संख्या आज पर्यंतची १६२८ आहे.

रा. रा. विनायक कृष्ण अभ्यंकर आकोला व रा. लक्ष्मण खुशालराव पांगारकर एलिचपूर हे दोघेही मुंबईची एल. एल. बी ची परीक्षा पास झाले असून रा. अभ्यंकर यांस सर्वोत्तमतेबद्दल स्पेन्सर बक्षीस मिळालें आहे ही आनंदाची गोष्ट होय

रा. रा. मेह्यू आफि. डायरेक्टर विद्याखाते यांस १ ल्या डिसेंबर पासून १ वर्षाची रजा देण्यांत आली आहे.

रा. रा. विश्वनाथ दामोदर खांडेकर यांस दर्यापूर कोर्टावर आफि. मुनसफ नेमिलें

रा. रा. गोविंद रामचंद्र माहादेवकर मुनसफ यांस आकोला येथें मुनसफ कोर्टावर हात्याहून आकोल्यास बदलण्यांत आलें.

रा. रा. भार्गव काशीनाथ सत्रे व रा. रा. देशपांडे या उभयतांस आकोल्यास मुनसफ नेमण्यांत आलें.

---

# NOTICE

In the Court of the Sub-Judge
Khamgaon

Civil Suit No. 36 of 1915

Shrichand Devchand ................. Plff

1 Keshavrao Janrao Deshmukh
2 Vase Mohiddin
3 Hari Vithal Snewalkar
} ...Deft

– + × + –

Notice is hereby given that by order of the Court in the above suit ordering the sale of property mentioned hereunder the undersigned will sell by public auction the right, title and interest of the plff. and Defendents above named in the partnership.

The sale will be held at Khamgaon on the 30th November 1915 at 9 a.m at the office of the Ambica Gin Factory according to the conditions of sale filed in court by the undersigned.

All the right, title and interest of the Plff and the Defendants above named in the partnership in the Ginning Factory situated at Khamgaon known as the Ambica Ginning Factory.

The factory consists of 8 Gins driven by an oil engine (Hornsby) and is fitted with most of the necessaries required to work a factory and is in all respects ready for work. It contains an oil engine of 24 break horse power and all appliances, one lathe 10 × 8½ with all its appliances, one brick built tank with pipes &c, one office room with a tinned roof, one room for Chaprashi near the gate, latrines built with brick and mortor, 8 Gins with their appurtenances complete. All this is enclosed in a Compound surrounded by wire fensing.

The whole of this factory stands on land for which rent shall have to be paid to its owner Mr. Deshmukh every year,

The public are requested to bid at the sale either personally or by agent duly authorized.

CONDITIONS OF SALE

The particulars of the property mentioned in the notice of sale have been stated to the best of the information of the Receiver, but the Receiver will not be answerable for any error misstatement or omission in the statement.

The amount by which the biddings are to be increased shall be determined by the receiver at the sale. In the event of any dispute arising as to the amount of a bid or as to the bidder the sale shall at once be held again.

The highest bidder shall be declared to be the purchaser provided always he be legally qualified to bid and provided that in the opinion of the Receiver the highest bid offered is so inadequate as to make it inadvisable to sell the property at that price.

It shall be in the discretion of the Receiver to adjourn the sale for reasons to be recorded by him.

The whole property will be sold in one single lot.

The person declared to be the purchaser shall immediately after such declaration pay to the Receiver a deposit of 25 o/o on the amount of his purchase money and in default of such deposit the property shall forthwith be put up again and resold.

The full amount of the purchase money shall be paid by the purchaser to the Receiver on the 15th day after the sale of the property exclusive of such day.

In default of payment of the balance of purchase money within the period allowed, the property shall be resold after an issue of a fresh notification of sale. The deposit after defraying the expenses of the sale will be forfeited to parties and the defaulting purchaser shall forfeit all claim to the property or to any part of same for which it may be subsequently sold.

By order of the Court
Vishwanath, Nagosa Sawji
Khamgaon
Receiver

29-10-1915
N. N. 389

---

## नोटीस

नोटीस बेशमी भगवान उदेभान कुणबी रा. धानोरे पोष्ट काजळेश्वर ता० मूर्तिजापूर

यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं, तुह्मी आह्मांस कांहीं दोष लावून जाती बाहेर टाकण्याचे हेतूनें आमचा न्हावी नामे झाबु वा। सोनाजी रा. कामठे यांस बंद केला आहे. त्या योगें तुह्मी फौजदारी गुन्ह्याचें उलंघन केलें आहे. तुह्मास आह्मी समक्ष व आमचे व तमचे नातेवाईकाकडूनही विचारलें तरी तुह्मी आमचे ह्माल्यास बंद करण्याचें कमी केलें नाहीं. शिवाय आमचे भाऊबंदास तुह्मी सांगतां कीं जर त्यांनीं आमचेशीं व्यवहार ठेवला तर त्यांनाही जातीबाहेर टाकूं. असे व इतर रितीनें तुह्मी स्पष्ट व अडून आह्मास त्रास देत आहां. तरी याबद्दल तुमचें काय ह्मणणें आहे तें ही नोटीस पावल्यापासून तीन दिवसाचे आंत कळवावें तसें न केल्यास आह्मी कायदेशीर इलाज करूं मु. आकोला ता. २०-११-१९१५ इ.

सही

अभीमान वा। चंद्रभान कुणबी
रा. धानोरे निशाणी खुद्द

नो. नं. ३९३

---

## नोटीस.

नोटिस बेशमी गोविंद रामजी भगत कारकुन मुनसफ कोर्ट आकोला.

यांसः—

खालीं सही करणार नोटिस देतो कीं, सन १९१४ च्या जून माहिन्याचे १८ तारखेस मी तुह्मास एक नोटिस दिली होती. व १ पोष्टांतून दिली होती. ती प्रमाणें तुह्मी वागला नाहीं. त्यावर गोभणीचे दोघें मारुती पाटील व इसोरा तेली हे माझे येथें येऊन त्यांनीं मला चार गोष्टी सांगून माझे मुलीस गोभणीस घेऊन गेले. त्या ठिकाणीं १५ दिवस मुलीस ठेउन त्यानंतर तीस आकोल्यास तुमचे घरीं आणून घातले. त्यावर १५ दिवसानीं तुह्मी माझे मुलीस स्वतः फारकती देण्याचे इरादानें व तो इरादा जाहिर करून माझे घरीं आणून घातले. व आपण धोत्र जोडा टाकून पळून गेलां. त्यानंतर तुह्मी तिला २ माहिन्याचे दिवस असल्या बद्दल लिहिले. याबद्दल नोटिस पावतांच आतां आपण गोभणीस यावे. त्या ठिकाणचे ४ पंच माझ्या घरीं घेऊन यावे व या मुलीस पंच हस्तें घेऊन जावे. नोटिस पावल्या तारखेवर ८ दिवसांत तुह्मी वर प्रमाणें न केल्यास मी पंचहस्तें तिचें गंधर्व लावणार. आणि नतर तुमची कोणतीही तक्रार ऐकणार नाहीं. व मी जबाबदार ही राहणार नाहीं. क. ता. २०-११-१५

सही

गणु मसाजी तेली द. खु.

नो० नं० ३९४

---

## मध्यप्रांत वार-रिलीफ असोशियेशन.

### (वऱ्हाड शाखेचा आक्टोबरचा हिशोब)

वरील संस्थेचे वऱ्हाड शाखेचे आकडे आमचेकडे प्रसिद्धीकरितां आले आहेत. त्यांवरून पाहतां जमेचे बाजूस जिल्हेवारीनें:—

| | उमरावती. | आकोला. | बुलडाणा | यवतमाळ. |
|---|---|---|---|---|
| मागील शिल्लक | ५२६-९-० | २९०००-४-० | २५७६-१३-० | ६५०-०-४ |
| आक्टोबर माहिन्यांत आलेला वसूल | ५७९-१२-० | ७५३ ६-० | ६३६-९-० | ८५८-११-० |
| एकूण | ११०६-५ | २९७५३-१०-० | ३२१३-६-० | १५०८-११-४ |
| **खर्च** | | | | |
| सैन्यास सुखोपयागी सामान पुरविण्यासाठीं. | २००-०-० | ११००-०-० | ३१५-८-६ | ८१-१-३ |
| कलकत्ता यंगमेन ख्रिश्चन असोशियेशन करितां | १००-०-० | ०-०-० | १००२-१३-४ | ०-०-० |
| बेल्जम रिलीफ फंडा. करितां | ५६-०-० | ०-०-० | १००२-१३-४ | ०-०-० * |
| सिमला येथील सेंट जान ॲंब्युलन्स असोशियेशन करितां | ७५-०-० | १०००-०-० | ०-०-० | १०००-०-० |
| मुंबई आरमारी रिलीफ फंडा करितां | ०-०-० | ५००-०-० | ०-०-० | ०-०-० |
| आफिस खर्च | ०-०-० | ४६-१३-० | ०-०-० | ०-०-० |
| एकूण खर्च | ४३१-०-० | २६४६-१३-० | २३२१-३-२ | १०८१-१-३ |
| माहिना अखेर शिल्लक | ६७५-५-० | २७१०६-१३-० | ८९२-२-१० | ४२७-१०-१ |

* सदरहु रकम लेडी राबर्टसन मोटार ॲंब्युलन्स फंडाकडे दिली आहे.

## जाहीरनोटीस

परमपुज्य गणपत हरीबा भोंग जात माळी रा० मौजे निमगांवपान ता. इंदापूर जिल्हा पुणें.

यांसः—

खालीं सही करणार इजकडून जाहीर नोटीस करण्यांत येते कीं, अजमासें बारा वर्षांवर दिवस होऊन गेले. तुमचे बरोबर माझें लग्न झाले आहे. त्या दिवसापासून तुमचे पत्र नाहीं. निरोप नाहीं, व तुह्मी कोठें राहात आहां हें ही समजत नाहीं. ज्या अर्थी मी तुमची लग्नाची बायको आहे, त्या अर्थी तुमचे शोधाची मजला जरूरी आहे. तुमचा पत्ता मजला लागत नसल्यामुळें मी आजपर्यंत मी आपले बापातर्फे लोकांचे रुपये २०० दोनशें कर्ज काढून खाल्ले आहेत. आतां मजला कोणी कर्ज ही देत नाहीं. करितां ही जाहीर नोटीस तुह्मास केली आहे. तरी सदर्दु नोटीस वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध होईल. त्या तरखे पासून पंधरा दिवसाचे आंत तह्मी येऊन लोकांचे कर्ज देऊन टाकावे. व मजला घेऊन जावे. वास्तविक पाहिले असतां ज्या अर्थी बारा वर्षांपासून तुमचा मुळींच पत्ता नाहीं. त्या अर्थी तुमचा मजवर कोणतेही प्रकारचा मुळींच हक्क राहिला नाहीं. परंतु दोन्ही कुळाचा अभिमान राखण्याकरितां ही नोटीस तुह्मास केली आहे. तरी वर लिहिलेप्रमाणें तुमचे कडून घडून न आल्यास मी दुसरा घरठाव करीन. मग माझेवर तुमचा कोणतेही प्रकारचा हक्क चालणार नाहीं. या नोटिसीचा खर्च व पुढें लागणारा खर्च तुमचेवर आहे. कळावें ता. १५।११।१५

सही

सुंदराबाई वा। रामजी माळी रा. रिसोड नि॥ खा॥ आंगठा

नो० नं० ३९२


सतत ४२ वर्षे चाललेला कारखाना.

## ए. जे. ह्मात्रे आणि सन सुगंधी.

ठि:--पांजरां | पोळचा नाका, चिमणलालमहाराजांचे मंदार भुलेश्वर - मुंबई.

एकच भाव! ओटो मुरंगी! एकच भाव!!

### आमचेकडे मिळणारा माल

ओटो मुरंगी

अत्तरें.— गुलाब, मोतिया, दवणा, अंबर, बकूल रुपाच, हिना, पाच, वाळा, जुई चांफा, अंबा, इस्तंबोल, केशर, मदनबाण पारिजातक, मुस्काहिना, गुलहिना, रुअबझा, केवडा, रुखस, चमेली, अगर. हीं अत्तर दर तोळ्यास १ रुपयापासून ८ रुपयेपर्यंत निरनिराळ्या भावाचीं मिळतील. २-३-४-६ रु.

तेलें.— चमेली, बेलिया, मुसुंबी, हिना, लिंबू, मेंदी, गुलाब, मसाला, नारंगी, सुगधराव, मोतिया, आवळा, नागर, कपाशी.

वरील तेलें दर रुपयास ६ तोळ्यापासून २८ तोळेपर्यंत निरनिराळ्या भावाची मिळतील दर बाटली ४ आणे.

अष्टगंधी अरगजा १ तोळ्यास ४ आ. ६ आ. १२ आ. १ रु. १॥ रु.पर्यंत अरगजा व कितना निरनिराळ्या सुवासाचा दर डबीस ३ आ. ४ आ. ६ आ. ८ आ. १ रु. उटणें दर डबीस १ आ. २ आ. ४ आ. ८ आ. पर्यंत. केशरी गोळी उत्तम २॥ आ. ५ आ. १० आ १। रुपयापर्यंत. क्याटलॉग फुकट

ह्याशिवाय कस्तुरी, केशर, गुलाबपाणी मध, उदबत्ती, रंगीत पाट, दशावतारी गंजिफे, सोंगट्या, बुद्धिबळें, आर्यवर्धक कार्डस, बिझिक, इसापिर्के, हस्तीदंती फासे व फण्या, पितळी सामान, पितळी शिंगे व करणे, चंच्या, सरबतें व मुरंबे, पक्या तारा, बदामाचें तेल, व वातहारक आणि केशवर्धक तेलें, सुर्टे व वेणीचें गंगावन इत्यादि वरील पत्यावर मिळेल. व्यापाऱ्यांस सवलत.

बाहेरगावच्या गिऱ्हाईकांस माल व्हल्युपेबलनें पाठविला जाईल. नो. नं. ३



ॐ नमः श्रीगणेशाय.

## आर्यवनौषधींचा कारखानाः—मुर्डी.

### मदनामृतसंजीवनी.

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक व पौष्टिक, वीर्यस्तंभक, रक्तशोधक, मनोत्साहक कांतिबुद्धिवर्धक, सुवर्णमाक्षिक, मौक्तिक, कस्तूरी व अनेक वनस्पतीमिश्र अद्भुत गुटिका.

यांच्या सेवनानें नपुंसकत्व, स्वप्नजन्य व इतर धातुपात, उन्हाळे इंद्रियशिथिलता कडकी, गर्मीसंबंधी मुरलेले विकार. मूत्रसंकोच, घातूचा पातळपणा, स्त्रियांची धुपणी, छातींत रोग हात, पाय मूत्रमार्ग व नेत्र यांचा दाह, क्षय, पांडुरोग, मुलांची खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य; मस्तकशूल, मुळव्याधी, वातरोग, निद्रानाश, पित्तविकार बाळंतरोग, मधुमेह, जुनाट पर्मा, मुष्टीमैथुनानें आलेली कृशता इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी, मजबूत व सतेज बनते. पचनशक्ती व स्मरणशक्ति भरपूर वाढून धातू व रक्त यांची शुद्धि, वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दीपन होतें, व मनास उत्साह देतात. दूध व जडान्न भरपूर पचूं लागतें. त्यांत उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण केले असल्यामुळें त्यांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून वरील विकारांवर अत्यंत गुणकारक आहेत, करितां गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकिटा मिळाल्या व नित्य मिळतात. पथ्यसेवनाची गरज मुळींच नसून स्त्रिया, पुरुष व मुलें यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहेत. ५ रुपयांचे आंत मिळणार नाहींत. एकदम ४ रुपयांच्यावर कितिही घेणारास टपालखर्च माफ आहे. चार रुपयाचें आंत वेगळा टपालखर्च ५ आणे पडेल. दर एकदम ३५ गो० १ रु० ७५ गो० २ रु० १६५ गो० ४ रु० २७५ गो० ६ रु० ५५० गो० १० रुपये.

१. **अपूर्व नेत्रांजन**—यानें वडस, सारा, फुलें, खुपऱ्या, बिंदु, काच, इ० नेत्रांचें सर्व विकार त्वरित बरे होऊन दृष्टि तीव्र व थंडगार राहते. या रोगास हें अंजन खरें रामबाण आहे. १॥ तो. ड. १ रु.

२. **परम्यावर अपूर्व मिश्रण**—कोणत्याही नवा जुना पर्मा व तज्जन्य दाह. तिडीक, मुत्रांची लाली, संकोच, पुयस्त्राव, रक्तस्त्राव इत्यादि विकार पथ्य नसता सात दिवसांत जातात. तिडीक एका घटकेंत जाते. असे रामबाण औषध कोठेंच मिळत नाहीं. बा० किं० १ रु० १। भार २ रु० सर्व औषध व्हीं० नें पाठंव.

सर्व सामानाचा मोठा क्याटलाग मागवावा. तो फुकट पाठवूं. औषधांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून तीं पूर्ण खात्रीची असल्याबद्दल असंख्य सर्टिफिकिटें आहेत. याशिवाय मोठमोठे रोगांवर अनेक औषधें, ग्रंथोक्त रसायनें, भस्में, पाक, गुटिका आसवें, तेलें व सुगंधी अत्तर वगैरे माफक दरानें मिळतात. अनु० ख० सो० ट० ख० वे० पडेल. रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं. प्रकृतिमान कळविल्यास रोग्याचें निदान व चिकित्सा कळवूं.

पत्ताः—मु० मुर्डी, पो० हर्णै, जिल्हा रत्नागिरी. } कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य.

नो० नं० ३६९



## Oriental Government Security Life Assurance Co., Ltd.

ESTABLISHED 1874.

HEAD OFFICE, BOMBAY. R. PATERSON BROWN MANAGER.

### FUNDS almost 5 CRORES.

INVESTED IN GOVERNMENT SECURITIES AND MUNICIPAL AND PORT TRUST BONDS.

*Claims paid* $4\frac{1}{2}$ CRORES

### A Decennial Record of Progress.

| Year. | No. of Polices in force. | Existing Assurances. |
|---|---|---|
| 1884 | 4.823 | 1,59,25,200 |
| 1894 | 20,110 | 5,26,08,850 |
| 1904 | 43,356 | 8 88,02,223 |
| 1914 | 65,269 | 12,37,10,910 |

| Year. | Total Income. | Total Assets. |
|---|---|---|
| 1884 | 6,77,552 | 14,41,429 |
| 1894 | 4259,,607 | 94,49,9718 |
| 1904 | 43,64,808 | 2,47,18,89 |
| 1914 | 72,46,0 | 4,96,86,509 |

### BONUS

The bonus for the premium ending 31 December 1912, constitntes sa record for the company. The next Division of profits will be made at 31 December of the current year when all With Profit Policies effected prior to that date will participate—

### *SPECIAL FEATURES.*

Absolute Security—Low Rates—Liberal Conditions.
Forty years continuously increasing prosperity.
Ninety per cent of the entire Profits, after provising for the Reserve Fund divided among the Policyholders every 3 years.
Native Lives are accepted at the same rates as Europeans
Loans granted to policyholders at reasonable rates.
Prompt Payment of Claims.

:0-

Full particulars, prospectus and proposal forms on application to:—

Influential and energetic Agents wanted-Terms liberal

**M. deSOUZA,**
CHIEF AGENT,
*C. P. Berar & Khandesh*
NagPUr.

N. N. 25


हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवाश्रमांत छापून प्रसिद्ध केलें

Regd-No. N 150

# वऱ्हाडसमाचार.

Berar-Samachar.

वर्ष ४९ ] आकोला--सोमवार तारीख २९ माहे नोव्हेंबर सन १९१५ ई० [ अंक ४३


## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हा. ........ २ रुपये
वर्गणी आगाऊ घेण्याची वहिवाट आहे.

### जाहिरात

मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा त्यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक } S. Clements,
आकोला ९।९।०९ } एजंट

नो. नं २

### अस्सल अंगुरी.

## हिंग

केवळ एक आणा तो. पवित्र केशर ॥।= तो. शुद्ध शिलाजीत. -॥- तो. खालिस कस्तूरी रु. २५ तो. तिब्बेती ममीरा रु. ३ तो.

काश्मीर स्टोर्स श्रीनगर नं० ९
नो० नं० ८

### हिंदुस्थानावर अरिष्ट

हिंदुस्थानांतील राहवाशांच्या पाठीस ज्वर व हिवताप यांचें आरिष्ट सदोदित लागलें आहे. पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिवतापाचें औषध व गोळ्या ह्या रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रु.

**बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या**

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें स्वरूप, त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार तावडतोब दूर होतात किं रु. १८.

**बाटलीवाला यांचें दंतमंजन.**

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिळाफ करून बनविलें आहे. किं. ८४

**बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.**

यानें गजकर्ण, कुजली, खरुज यांचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ८४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु. वरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

DR. H. L Batliwala, Sons & Co Ltd
N. N. 5 Dadar Bombay.

## चांदीचीं भांडीं

नाशिक येथें तयार केलेलीं सर्व प्रकारचीं सुबक व घाटदार भांडीं आमचेकडे विक्रीस तयार असतात. भाव माफक व्ही. पी. नें अगर रोखीनें पाठवू. मालाचे खरेपणाबद्दल ग्यारंटी देऊ.

पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन
रविवार पेठ नाशिक सिटी
नो. नं. ४

### ब्रह्मविद्या ग्रंथ रत्नमाला

या मासिकाचा वर्षारंभ माघ शु० ९ तिसऱ्या वर्षापासून ७२ पानांचें मासिक वा० व० ट० खर्चासह तीन रुपये. यांत **श्रीशंकराचार्य, शंकरानंद, व विद्यारण्य** यांचे उपनिषदावरील भाष्य, **आत्मपुराण व अनुभूतिप्रकाश** हे ग्रंथ क्रमानें मूळ, अन्वय, अर्थ व विवरण यांसह प्रसिद्ध होतात. यांत हल्लीं बृहदारण्यकाचा भाष्यार्थ चालू आहे. मागील दोन वर्षांतील वीस प्रकरणें १० रुपयांस घेऊन तिसऱ्या वर्षी वर्गणीदार होणारास '**वैशेषिक दर्शन**' बक्षीस.

**सनातन वैदिक धर्माचें, तत्त्वज्ञानाचें** व सामाजिक विषयाचें विवेचन करणारें--

### आचार्य

पाक्षिक, दर एकादशीस नियमितपणें प्रसिद्ध होतें. पृष्ठें २४ वा० व० ट० खर्चासह १ रु० ८ आणे वरील मासिक घेणारास फक्त १रु० वरील विषयांशिवाय यांत संस्कृत काव्यें, नाटकें व इतर लहान लहान ग्रंथ यांचाही परामर्श केला जातो. धर्म संबंधीं प्रश्नांचीं समर्पक उत्तरेंही दिलीं जातात नमुना मागवा.

पत्ता— विष्णुशास्त्री बापट.
२४१ सदाशिव पेठ पुणें.
नो० न० ३

## नोटीशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील.
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

सूचनाः— गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. पुढें येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल.

### विक्रीस तयार

आमचे छापखान्यांत दरखास्तीचे, वकील पत्राचे, परत मत्ण्याचे, लिस्टफार्म पर्च्यांचे व नकलेकरितां करावयाच्या अर्जांचे नमुने छापून तयार आहेत. ते आमचे छापखान्यांत कोणत्याही वेळीं विकत मिळतील.

वऱ्हाडसमाचार कार्यालय, } मॅनेजर
सदाशिवाश्रम, आकोलें }

### श्री दत्तात्रय अलंकारालय कोल्हापूर

आमचे कारखान्यांत स्वतःचे देखरेखेखालीं, मुद्दाम तयार केलेले उत्तम सोन्याचे सुबक दागिने— मंगळसुत्र माळ, ठुशा-जोड, गुलाबाचीफुलें, बिल्वदळी टीका, मुद्रा, अग्रफुलें साखीं व घागऱ्याचीं वगैरे सर्व जातीचा माल—तसेच चांदीच्या मासोळ्या, चाळ, उपकर्णी, ताटें, वाट्या, गडवे, वगैरे माफक दरानें मिळतील. आह्मी सर्व सोनें न्याशनलचें शंभर नंबरी वापरीत असतों. व डागाचा उपयोगही नियमितच केलेला असतो. यामुळें जिन्नस पांढरे पडण्याची अगर वाईट दिसण्याची भीति बाळगण्याचें मुळींच कारण नाहीं. आमचे जिनसाची लाख काढून वजन तोलून पाहावें. गिऱ्हाइकांची खात्री करून देण्यास आह्मी तयार आहों. व्यापाऱ्यास कमिशन मिळेल. ऑर्डरी प्रमाणें माल तयार करून देऊं, चांदी सोन्याचे खरेपणाबद्दल आह्मी जबाबदार आहों. माल रोखीनें अगर व्ही. पी. नें पाठविला जातो. ऑर्डरी बरोबर एक रुपया अगाऊ पाठविला पाहिजे.

श्रीदत्तात्रय अलंकारालय—कोल्हापूर
नो. नं १९१

## कौतुकरत्नाकर

छिन्नमस्तानी धुमावती; मातंगी भैरव षोडश देवतांचे चित्रांसह
पृष्टसंख्या ६००; विषय ६०० वर आवृत्ति ९ वी. प्र. २००००,

बंगाल्यांतील कामरूपदेशी ही विद्या फार प्रबल असून तिकडील जटेकी, लंगोटि, छा छु करणारे अज्ञानवादी यांचेकडून खरी माहिती मिळवून सिद्धनागार्जुन मंत्र महोदधि, महानिर्वाणतंत्र उड्डीश वगैरे ग्रंथाचे आधारें हा भानुमती ग्रंथ तयार केलेला आहे. ह्याच धर्तीवर प्रसिद्ध झालेल्या इंद्रजाल, जादुबाई इतरसंग्रह, कौतुकचिंतामणी, किमिया, गुप्त गारुडी विद्या वगैरे पुस्तकांचा ह्याचेपुढें हिशेब नाहीं. यांत कोणते विषय आहेत याचा विस्तार कळविणें फार कठीण आहे. मंत्र तंत्र व यंत्र विधिपूर्वक करणें नियम प्रहारिकांचीं वर्णनें भानुमती यंत्र वशिकरण शास्त्र नानाप्रकारचे स्तंभन प्रयोग, उच्चाटन, जारण, मारण प्रयोगविधि, औषधी हुन्नर, नानारंग कला, आत्मविद्यामेस्मेरिझम प्रयोगविधि वैगेरे अनेक विषय आहेत. किं. ट. व्ही. पी. सह १॥ रुपया

## कोकशास्त्र अथवा जीवनसौख्य.

ज्यांना खरोखरीच सौख्य भोगणें आहे त्या प्रत्येकांनीं हें पुस्तक अवश्य संग्रही ठेवावें. या पुस्तकांत कोणते विषय आहेत हे पुस्तकाच्या नांवावरून सहज समजण्याजोगें असल्यामुळें त्याचें वर्णन करणें नको किंमत १ रुपया ट. ख. ३ आणे.

पत्ताः— गंगाधर आर. आणि कंपनी.
हरिश्चंद्र बिल्डिंग मुंबई नं. ४

नो. नं. ३६४

## नोटीस

ती. गं. भागाबाई मर्द गणपत खडसने राहणार निराट तालुका आकोला.

यांसः—

खालीं सही करणार यांजकडून कळविण्यांत येते कीं तुह्माजवळ जी स्थावर जंगम जिन्नगी आहे तीला तुमच्या पश्चात गणपतीचा सख्खा चुलतभाऊ या वारसदाराच्या नात्यानें मीच इकटा हक्कदार व वारस आहे. तुह्मी जिन्नगीच उपभोग यथायोग्य घ्यावा पण दुसऱ्या लबाड लोकांच्या भूलथापीला भुलून कोणत्याही प्रकारची विक्री गहाण वगैरे देवघेव करूं नये. जो कोणी व्यवहार करील त्याला सर्व जोखीम सोसावी लागेल आणि त्या संबंधानें जिन्नगी जबाबदार राहणार नाहा. तुह्माला कर्ज वगैरे काढण्याचें कारण कधींच नव्हतें आणि जर कदाचित पैशाची गरज पडेल तर मी जेवढी लागेल तेवढी रक्कम देण्यास तयार आहे. ही जाहिर सूचना तुमच्या व माझ्या फायद्यासाठीं मुद्दाम देत आहे. कळावें ता. २२ नोंवेंबर सन १९१५ इ.

सही

बळीराम विठोबा कडसने राहणार निराट ता. आकोला

नो. नं. ३९५

## जाहीरनोटीस

नोटीस राजश्री श्रावण वा। माधव पाटील रा. पूर्वी चिंचोली ता. खामगांव हल्लीं कोठें पत्ता नाहीं.

यांसः—

या जाहिर नोटिशीनें कळविण्यांत येते कीं, तुह्मी माझे लग्नाचे नवरे असून घरांतल्या घरांत आईवर रागाऊन एका साधूच्या संगतीनें कोठें निघून गेलां त्याचा पत्ता नाहीं. या गोष्टीस अंदाज ९ वर्षें झालीं. मी पुष्कळ तपास केला परंतु कांहींच पत्ता नाहीं. या वरून तुमच्या आस्तित्वाबद्दल ही मला शंका येते. इतके दिवस मी तुमचे नांवावर बसले. मला तुमच्यापासून २ मुलें आहेत. परंतु लोकापवादास्तव आतां जास्त दिवस तसें राहणें मला शक्य नाहीं. करितां जातिरिवाजाप्रमाणें मला गंधर्व करणें भाग आहे. तरी तुह्मास या जाहिर नोटिशीनें कळविते कीं, तुह्मी कोठें ही असल्यास आज तारखेपासून १५ दिवसांत येऊन मला भेटावें. ह्मणजे पुढील गोष्टी होऊन जातील. नाहीं पेक्षां वरील मुदती नंतर तुमचे अस्तित्व नाहीं, असें मानून मी दुसरें गंधर्व करीन. मग तुमचा कोणताच हक्क मजवर राहणार नाहीं. सर्वत्रांस ही नोटिस जाहिर असे. क. ता. २४-११-१५

सहीची निशानी आंगठा

सखी मर्द श्रावण पाटील रा. हल्लीं गऊलखेड ता. खामगांव पो. शेगांव हिचा खुद्द

नो. नं. ३९६

## नोटीस.

नोटिस संपत वा। लक्ष्मण वाकुडे कुणबी रा. हिवरखेड रूपराव ता. आकोट

यांस—

मी खालीं सही करणार नोटिस देते कीं तुह्मी माझे लग्नाचे नवरे असून लग्नास १५ वर्षें झालीं. व वयांत येऊन ही सुमारें १२ वर्षें झालीं. तुह्मास रक्तपीती असल्यानें तुह्मी संसारास अयोग्य आहांत. सबब आपल्या जाती रिवाजा प्रमाणें माझे खावटीचे पैसे देऊन मला फारकती द्यावी, व मोकळे करावें. तसें ही नोटिस पावल्या पासून ८ दिवसांत न केल्यास मला दिवाणींत दावा करून फारकती मिळवावी लागेल. क. ता. २१-११-१९१५ इ.

सहीची निशानी आंगठा

बनाई संपत वाकुडे रा खोडगांव ता. दर्यापूर पो. अंजनगांव हिचा खुद्द

नो नं. ३९७

## NOTICE

In the Court of the Sub-Judge Khamgaon

Civil Suit No.36 of 1915

Shrichand Devchand ..................Plff

1 Keshavrao Janrao Deshmukh
2 Vase Mohiddin
3 Hari Vithal Shewalkar
} ...Deft

—+×+—

Notice is hereby given that by order of the Court in the above suit ordering the sale of property mentioned hereunder the undersigned will sell by public auction the right, title and interest of the plff.and Defendents above named in the partnership.

The sale will be held at Khamgaon on the 30th November 1915 at 9 a.m at the office of the Ambica Gin Factory according to the conditions of sale filed in court by the undersigned.

All the right, title and interest of the Plff and the Defendants above named in the partnership in the Ginning Factory situated at Khamgaon known as the Ambica Ginning Factory.

The factory consists of 8 Gins driven by an oil engine (Hornsby) and is fitted with most of the necessaries required to work a factory and is in all respects ready for work. It contains an oil engine of 24 break horse power and all appliances, one lathe 10×8½ with all its appliances, one brick built tank with pipes &c, one office room with a tinned roof, one room for Chaprashi near the gate, latrines built with brick and mortor, 8 Gins with their appurtenances complete. All this is enclosed in a Compound surround d by wire fensing.

The whole of this factory stands on land for which rent shall have to be paid to its owner Mr. Deshmukh every year,

The public are requested to bid at the sale either personally or by agent duly authorized.

### CONDITIONS OF SALE

The particulars of the property mentioned in the notice of sale have been stated to the best of the information of the Receiver, but the Receiver will not be answerable for any error misstatement or omission in the statement.

The amount by which the biddings are to be increased shall be determined by the receiver at the sale. In e event of any disput arising as to the amount of a bid or as to the bidder the sale shall at once be held again.

The highest bidder shall be declared to be the purchaser provided always he be legally qualified to bid and provided that in the opinion of the Receiver the highest bid offered is so inadequate as to make it inadvisable to sell the property at that price.

It shall be in the discretion of the Receiver to adjourn the sale for reasons to be recorded by him.

The whole property will be sold in one single lot.

The person declared to be the purchaser shall immediately after such declaration pay to the Receiver a deposit of 25 o/o on the amount of his purchase money and in default of such deposit the property shall forthwith be put up again and resold.

The full amount of the purchase money shall be paid by the purchaser to the Receiver on the 15th day after the sale of the property exclusive of such day.

In default of payment of the balance of purchase money within the period allowed, the property shall be resold after an issue of a fresh notification of sale. The deposit after defraying the expenses of the sale will be forfeited to parties and the defaulting purchaser shall forfeit all claim to the property or to any part of same for which it may be subseqnently sold.

By order of the Court
Vishwanath Nagosa Sawji
29-10-1915 Khamgaon
N. N- 389 Receiver

वऱ्हाडसमाचार

मित्ति कार्तिक वद्य ८ शके १८३७

## हिंदुस्थानांतल्या शेतकीची प्रगति.

मि. मॅकेना यांनीं केलेला हिंदुस्थानांतील शेतकीचा रिपोर्ट सरकारी रिपोर्टांना अपवाद आहे. बहुतेक सरकारी अधिकाऱ्यांच्या रिपोर्टांतून झालेल्या चुकांबद्दल स्पष्ट कबूली दिलेली नसते. चुका झालेल्या दिसल्या तरी होतां होईल तों त्यांचें समर्थन करावयाचें किंवा त्यांबद्दलचा दोष परिस्थितीवर लादावयाचा त्यांचा हेतु असतो. मि. मॅकेना यांनीं स्पष्टपणें लिहिलें आहे कीं १९०५ सालापूर्वीं दहा वर्षें सरकाराकडून शेतकी सुधारणेचे जे प्रयत्न झाले ते चुकीच्या तत्त्वावर झाले. त्यांचा लेकांना कांहीं उपयोग झाला नाहीं. खुद्द सरकारी अधिकारी सुद्धां त्या प्रयत्नांना विशेष मानीत नसत. थोड्या पर्यायानें ह्मणावयाचें ह्मणजे या वेळच्या प्रयत्नाचे पायीं रयतेचा जो पैसा खर्च झाला तो अनाठायीं गेला. आह्मी या बद्दल सरकारी अधिकाऱ्यांना दोष देत नाहा; तर सरकारच्या पद्धतीला जबाबदार धरतों. हिंदुस्थानचे शेतकरी अडाणी व जुन्या वहिवाटीला चिकटून राहणारे आहेत. त्यांच्याशीं मिळून मिसळून वागल्याशिवाय आणि सुधारलेल्या कृषिकर्म पद्धतीचें ज्ञान त्यांना त्यांच्या कुणबाऊ भाषेंत तोंडानें करून दिल्याशिवाय व या पद्धतीपासून किती फायदा होतो हें त्यांना प्रत्यक्ष रुपये आणे पैंच्या रूपानें दाखविल्याशिवाय ते आपल्या जुन्या पद्धतीचा त्याग करून नवी पद्धत कधा घ्यावयाचे नाहींत. पण १९०५ सालापूर्वीं शेतकी खात्याची पद्धत काय असे हें पाहिलें तर त्या पद्धतीचा कांहीं एक परिणाम आमच्या शेतकऱ्यांवर झाला नाहीं याबद्दल कोणास आश्चर्य वाटणार नाहीं. कृषिकर्म शास्त्रज्ञांनीं इंग्लिश किंवा अमेरिकन शेतकीचीं सुधारलेलीं आउतें आणावयाचीं, त्यांचें प्रदर्शन मांडावयाचें, त्यांच्या उपयुक्ततेबद्दल इंग्रजींत व्याख्यानें द्यावयाचीं, मग तीं ऐकण्यास खरे शेतकरी येवोत किंवा न येवोत, आणि आले तरी त्यांना आपलें भाषण समजो, अगर न समजो. पुष्कळसा सरकारी पैसा खर्च करून नमुनेदार शेतांत चांगलें पीक आलेलें दाखवावयाचें, पण हें पीक येण्यासाठीं किती पैसा खर्च करावा लागला या विषयीं बेफिकीर असावयाचें, रिपोर्ट उत्तम रीतीनें रंगवावयाचे कीं झालें त्यांचें काम. पण १९०५ सालापासून या पद्धतात जबर क्रांति घडून आली आणि ती हिंदुस्थानच्या फायद्याची झाली. या गेल्या दहा वर्षांत परदेशी आउतें आणण्याचें सोडून शेतकी खात्यानें इकडील आउतांत व खतांत कोणत्या सुधारणा करतां येतील तें पाहण्याकडे आपला उत्साह खर्च केला. अधिक महत्त्वाच्या पिकांच्या सुधारणेचा प्रश्न आधीं हातीं घेतला. खऱ्या शेतकऱ्यांमध्यें मिळून मिसळून शेतकी खात्याचे अधिकारी त्यांच्याशीं त्यांच्या देशी भाषेंत बोलं चालूं लागले. देशी भाषांतून त्यांना त्यांच्या चुका समजावून देऊं लागले. त्यां खात्री करून देऊं लागले शेतकीची सुधारणा जुलुमानें होणारी नसून लोकांशीं सहानुभूतीच्या वर्तनानें व लोकांच्या सहकारित्वानें होणारी आहे ही गोष्ट आपल्या वर्तनानें दाखवूं लागले याचा इष्ट तोच परिणाम झाला. लोकांना उद्योगाचा माहिमा कळूं लागला. बडबडीपेक्षां प्रत्यक्ष कृतीचें महत्त्व अधिक आहे हें सरकारी अधिकाऱ्यांना ही कळलें. सरकारी अधिकारी आपले हितकर्ते आहेत याची खात्री शेतकऱ्यांना पटूं लागली. ते आपल्या अडचणी शेतकी खात्याला कळवूं लागले, व त्या दूर करण्याचे कामीं सरकारी अधिकाऱ्यांची मदत घेऊं लागले. पिकांसाठीं बीं कसें निवडावें, तें कसें पेरावें, त्यांना खत कोणतें घालावें, पिकांवर पडणारी कीड कशी मारावी वगैरे प्रत्येक बाबतींत नव्यानव्या माहितीचा ते उपयोग करून घेऊं लागले, व याचा इष्टपरिणाम हळूंहळूं दिसूं लागला. या कामीं सहकारी पतपेढ्या व आग्रिकलचरल ब्यांक्स यांचा ही शेतकऱ्यांना फार उपयोग झाला. सारांश, शेतकी खात्याच्या खऱ्या कामाला प्रारंभ १९०५ सालानंतर झाला असें ह्मटलें पाहिजे. तों पर्यंतचा काळ केवळ प्रयोग करण्यांत खर्च झाला व सरकारला आपण ज्या मार्गानें जात आहों तो मार्ग चुकीचा आहे हें १९०५ च्या सुमाराला कळलें. तेव्हांपासून आतांपर्यंतचा काळ हा जरी फार अल्प आहे तरी योग्य मार्गानें गेल्यामुळें त्यापासून देशाचा पुष्कळच फायदा झाला आहे हें सरकारला दाखवितां आलें. गेल्या दहा वर्षांत सरकारानें शेतकीखातें

फार वाढविलें. पूर्वी या खात्याचा वार्षिक खर्च ८८११२४ रुपये होता, तो हल्लीं ५१३०६५२ रुपये झाला आहे. तरी पण तो सार्थकीं लागत आहे. कारण या एकावन लक्ष रुपयाच्या खर्चामुळें पिकाची वाढ ३॥ कोट रुपयांची झालेली आहे. ही खरी सुधारणा ह्मटली पाहिजे, आणि जरी हिंदुस्थानचा विस्तार व एकतीस कोट लोकांचें शेतकीवरचें जीवन यांच्या मानानें ३॥ कोट रुपयांची वाढ ही कांहींच नाहीं असें दिसतें, तरी ही सुधारणा केवळ १० वर्षातली आहे ही गोष्ट लक्षांत घेतली ह्मणजे तिच्या विषयीं समाधान व्यक्त केल्यावांचून राहवत नाहा. आह्मांला यांत आनंदाची गोष्ट ही वाटते कीं सरकारी अधिकाऱ्यांना आपलें चुकतें कोठें हें कळन आलें व होत असलेली चूक सुधारण्याचा निश्चय करून त्यांनीं आपला कार्य– कोण फिरविला; व सहानुभूति आणि सहकारिता या गोष्टी जशा एकंदर राज्यकारभारांत अत्यंत महत्वाच्या आहेत, असें बादशहा पांचवे जार्ज साहेब यांनीं आपल्या मुत्सद्यांस सांगितलें, तशाच त्या कृषिकर्माच्या सुधारणेंतही फार कार्यकारी आहेत हें मि. म्याकेना आपल्या रिपोर्टांत सांगत आहेत. तिकडे अधिकाऱ्यांचें अधिकाधिक लक्ष जाईल असें आह्मी इच्छितों.

---

## आणखी एक हानि!

ह्या नोव्हेंबर महिन्याच्या प्रारंभीं जो जंगी उल्कापात झालेला दिसला, त्याच्या प्रभावाची प्रचीति ही लोकांना तात्काळ आलेली पाहून उल्कापात व राष्ट्रीय हानि यांचा कांहीं निकट संबंध असावा अशी शंका सामान्य माणसाला येणें स्वाभाविक आहे. या उल्कापातानंतर लवकरच आमचे परम पूज्य व प्रिय बादशहा पांचवे जार्ज यांना घोड्यावरून पडल्यामुळें थोडावेळ शारीरिक वेदना भोगाव्या लागल्या. त्याच सुमारास हिंदुस्थानच्या राष्ट्रीय सभेचे आधारस्तंभ व हिंदुस्थानचे अत्यंत प्रेमळ व कळकळीचे मित्र सर हेनरी कॉटन यांच्या निधनाच्या वार्तेनें आमच्या लोकांच्या अंतःकरणास जोराचा धक्का दिला. त्यांतून आह्मी सावरतों न सावरतों तोंच 'मुंबईचा सिंह' हें योग्य नांव धारण करणाऱ्या सर फेरोजशहा मेथाचें देहावसान झालें, आणि त्याला ही फार दिवस लोटले नाहींत तोंच हिंदुस्थानासारख्या पतित राष्ट्राला स्फूर्ति देण्यासारखें ज्यांचें चरित्र होतें असे अमेरिकेंतील नीग्रो जातीचे गुरू मि. बूकर टी. वाशिंगटन यांनाही निर्घृण काळानें या जगांतून नेल्याची वार्ता येत आहे. हे तिघेही पुरुष आपापल्या परीनें तरुणांचे नेते होते असें ह्मणण्यास हरकत नाहीं. सर हेनरी कॉटन यांनीं हिंदुस्थानांत सरकारी नोकरीवर असतांनाच आपल्या हिंदी बांधवाविषयींची न्यायबुद्धि व सहानुभूति या गुणांची प्रचीती लोकांस आणून दिली होती, व पुढें पेनशन घेऊन विलायतेस गेल्यावर ही हिंदुस्थानचें हित हाच एक त्यांना निदिध्यासाचा विषय होऊन बसला होता. त्यांच्या पोक्त सल्ल्यामुळेंच राष्ट्रीय सभेचें तारूं अनेक राजकीय वावटळींतून सुखरूपपणें पार पडून प्रगतीचा मार्ग जोरानें आक्रमण करूं लागलें होतें. वृद्धपणीं ही त्यांच्या हिंदुस्थानाविषयक परिश्रमांत बिलकुल शिथिलता आली नाहीं. त्यांचें आशावादित्व जबर होतें. या बाबतींत सर फेरोजशहा यांच्याशीं त्यांचें फार साम्य होतें. सर फेरोजशहा यांनीं अर्थकरी विद्या संपवून तींत प्रावीण्य संपादलें होतें. तथापि अर्थसंपादन हा त्यांनीं आपला जीवितोद्देश कधींच केला नाहीं. उत्तम नागरिक व उत्तम देशाभिमानी पुरुष यांची सांगड त्यांनीं आपले ठायीं घातली होती. निर्भीडपणा हा गुण त्यांच्याठायीं प्रामुख्यें करून होता. यामुळें पुष्कळ वेळां सरकारी अधिकारी व खुद्द त्यांचे देश बांधव या दोघांच्या ही अप्रीतीला ते पात्र करून घेत. पण अखेरीस त्यांच्याच ह्मणण्याची सत्यता अनुभवास येऊन सर फेरोजशहाविषयींची दोघांची पूज्यबुद्धि वृद्धिंगत होई. मुंबई म्युनिसिपालिटी ही संस्था साऱ्या हिंदुस्थानाला आदर्शभूत झालेली आहे त्याबद्दलचें सगळें श्रेय त्यांचें आहे. त्यांच्या मृत्युमुळें नुसता मुंबई इलाखाच नव्हे तर सारा हिंदुस्थान देश शून्य दिसूं लागला आहे. तिसरी हानि ह्मणजे अमेरिकेंत गुलामगिरींतून मुक्त झालेल्या निग्रो लोकांना उन्नतीच्या मार्गाला नेण्यासाठीं अविश्रांत परिश्रम करणारे आणि पतितोद्धार करणारांना गुरु तुल्य असे मि. बूकर टी. वाशिंगटन यांचा मृत्यु होय. मि. वाशिंगटन यांचें नांव ठाऊक नाहीं असा सुशीक्षित मनुष्य कोणत्याही सुधारलेल्या राष्ट्रांत सांपडणें शक्य नाहीं. त्यांनीं आपलें कर्तव्यक्षेत्र आंकुचित— निग्रो जातीच्या उद्धारापुरतें ठेविलें होतें. पण त्या कामीं आपलें सारें तनमनधन अर्पण करून लक्षावधि नीग्रो जातीच्या लोकांना शिक्षण देऊन उन्नतीच्या मार्गाला लावून दिलें. त्यांची अप्रतिम लोकसेवा इहलोकीं व परलोकीं ही रुजु आहे. यांचें चरित्र इतकें निष्कलंक व स्फूर्तिदायक आहे कीं ते देहरूपानें गेले तरी चरित्ररूपानें राहिलेला त्यांचा अवशेष कित्येक पिढ्यांचा उद्धार करीत राहील. 'मरावें परी कीर्तिरूपें उरावें' ही समार्थोक्ति या तिघाही महात्म्यांना सारखीच लागूं आहे.

---

## इतर बातम्या.

लाहोरच्या कटाच्या खटल्यांत ज्यांना फाशीची शिक्षा सांगण्यांत आल्या होत्या त्यांपैकीं सोळा जणांच्या शिक्षा नेकनामदार लॉर्ड हार्डिंज यांनीं फिरवून फाशीबद्दल जन्मठेप काळेपाण्याची शिक्षा केल्या आहेत. व्हाइसराय साहेबांच्या या कृपालुत्वानें त्यांच्या लोकप्रियतेंत मोठी भर पडली आहे.

पुणें येथील नूतन मराठी विद्यालयाच्या चालक मंडळीनें जें एक नवें आर्टस कॉलेज काढण्यास युनिव्हर्सिटीची परवानगी मागितली आहे त्याच्या इमारतीचें काम पुढील महिन्यांत पूर्ण होऊन १९१६ च्या जून मध्यें कॉलेज सुरूं होईल असा रंग आहे.

भावनगरचे दिवाण सर प्रभाशंकर पट्टणी यांनीं पेनशन घेतलें.

हिंदुयुनिव्हर्सिटीच्या इमारतीसाठीं बनारस जवळ नागांव येथें एक जागा पसंत करण्यांत आली आहे. येत्या फेब्रुवारींत लॉर्ड हार्डिंज यांच्या हस्तें त्या इमारतीच्या पायाचा दगड बसविण्यांत येईल.

व्हाइसराय साहेबांच्या कौन्सिलचे मेंबर सर अली इमाम यांची मुदत संपल्यामुळें ते काम सोडून जाणार ह्मणून व्हाइसराय साहेबांनीं त्यांना एक मेजवानी दिली. त्य वेळीं त्यांनीं सर अली इमाम यांचा स्वार्थत्याग, पोक्त सल्ला, आणि साह्यतत्परता इ. गुणांची फार प्रशंसा केली.

गेल्या वर्षाच्या मुंबई इलाख्यांतील शिक्षणखात्याचा रिपोर्ट नुकताच प्रसिद्ध झाला आहे. त्यावरून तेथें हायस्कुलांची संख्या मागील वर्षापेक्षां कमी झालेली दिसून येत आहे. विद्यार्थ्यांची संख्या मात्र वाढली आहे. अशी स्थिति असल्यावर विद्यार्थ्यांची गर्दी कां दिसणार नाहीं?

इंदुर येथें ता. २१ नोव्हेंबरपासून श्री. महाराज होळकर सरकारच्या हुकुमानें 'मल्लारि मार्तंड विजय' नांवाचें एक हिंदी-मराठी साप्ताहिक वर्तमानपत्र निघूं लागलें आहे. पत्राचा उद्देश, कृषिकर्म, व्यापार, विद्या, सहकारित्व, उद्योगधंदे, साहित्य इ. विषयांची सुगम अशी माहिती देऊन लोकांत शिक्षणाचा व सुविचाराचा प्रसार करणें हा आहे. याचें संपादकत्व 'आनंद' कर्ते रा. वासुदेव गोविंद आपटे बी. ए यांचेकडे देण्यांत आलें आहे. चौतीस वर्षांनंतर इंदूर संस्थानांत वर्तमानपत्र पुनः निघूं लागलें याबद्दल इंदूरची प्रजा महाराजांना धन्यवाद देत आहे.

धार संस्थानानें प्रतिष्ठितपणाचा दाखला आणिल्याशिवाय दुसऱ्या रियाशतींतल्या माणसांना आपल्या राज्यांत तीन दिवसांपेक्षां अधिक दिवस राहण्याची मनाई केली. संशयखोरपणाची आतां कमाल झाली असें ह्मटलें पाहिजे!

हिंदुस्थानांतल्या सगळ्या खिस्ती मिशनरी लोकांचें कान्फरन्स गेल्या आठवड्यांत माथेरान येथें भरलें होतें. जर्मन मिशनरींचा राजकारणाशीं संबंध आहे अशी जी शंका कित्येक घेतात तिचा कान्फरन्सनें तीव्र निषेध केला.

नागपूर येथें ता. १६ रोजीं इंडियन मेडिकल बोगस डिग्री बिलाविरुद्ध लोकमत जाहिर करण्यासाठीं महाराष्ट्र, मध्यप्रांत, वऱ्हाड येथील प्रमुख नागरिकांची व कलकत्त्याच्या खाजगी मेडिकल कॉलेजांतून पास झालेले डाक्तर यांची परिषद डॉ. काणे यांच्या अध्यक्षत्वाखालीं भरली होती. बिलाविरुद्ध सरकाराकडे अर्ज पाठविण्याचें ठरलें.

---

## निरर्थक वाद.

अलीकडे 'लोकशिक्षण' मासिकाच्या दोन तीन अंकांत एका अत्यंत शुष्क अशा मुद्यावर वादविवाद करण्यांत कित्येक शहाणीसुर्ती विद्वान् मंडळी गुंतलेली पाहून रिकामा न्हावी, आणि भिंतीला तुंबड्या लावी या मराठींतल्या ह्मणीची आठवण होते. पूर्वपक्षाचें ह्मणणें आहे कीं सध्याची सरकारनें व युनिव्हर्सिटीनें ठरविलेली शिक्षण पद्धती सदोष असून लोकहित तिनें जितकें साधावें तितकें साधलें जात नाहीं. अर्थात् असल्या प्रकारचें शिक्षण देण्याकरितां आमच्यांतल्या कित्येक कर्तृत्ववान् व बुद्धिमान् माणसांनीं खाजगी संस्था स्वतःचें नुकसान करून चालविणें ह्मणजे लोकांच्या द्रव्याचा अपव्यय व स्वार्थाचा निष्कारण त्याग होय, आणि असें दुहेरी नुकसान करणाऱ्या संस्थेचें उदाहरण ह्मणून पूर्वपक्ष करणारानें पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजचें उदाहरण दिलें होतें. पूर्वपक्षाच्या या दोन मुद्यांपैकीं पहिल्या मुद्यासंबंधानें कोणाचाही मतभेद असेल असें वाटत नाहीं. खुद्द सरकार व युनिव्हर्सिट्याही आपण ठरविलेला शिक्षणक्रम निर्दोष आहे असें समजत असेल असें आह्मांस वाटत नाहीं. तसें असतें तर वेळेवेळीं त्यामध्यें ज्या सुधारणा घडून येतात त्यांचें कारण नव्हतें. वादग्रस्त मुद्दा आहे तो दुसरा आहे. ह्मणजे अशा दोषयुक्त शिक्षणपद्धतीनें शिक्षण देण्यासाठीं लोकांच्या आश्रयानें व स्वार्थ त्यागाच्या पायावर उभारलेल्या खाजगी संस्था निरर्थक आहेत काय? कां सध्याच्या परिस्थितींत त्या लोकोपयोगी कार्य करीत आहेत? या प्रश्नाचा विचार करतांना सध्याची पारिस्थिति दृष्टीआड करून चालावयाचें नाहीं. सध्या सरकारचें लक्ष प्राथमिक शिक्षणाकडे अधिक खर्च करून इंग्रजी शिक्षणाच्या शाळांचा खर्च होईल तेवढा कमी करण्याकडे सरकारची प्रवृत्ति आहे. उलट लोकांची प्रवृत्ति आपल्या मुलांना इंग्रजी शिक्षण देण्याकडे फारच झुकली आहे. याचा परिणाम असा झाला आहे कीं प्रत्येक हायस्कुलांत विद्यार्थ्यांची इतकी गर्दी झाली आहे कीं शेकडो विद्यार्थ्यांना त्यांत प्रवेश मिळेनासा झाला आहे. अशा वेळीं ज्यांना या शाळेंत प्रवेश मिळत नाहीं त्यांनीं शिक्षणाच्या लाभास मुकावें कीं त्यांच्या सोयीसाठीं खाजगी शाळा लोकांच्या आश्रयानें काढणें अवश्य आहे हा प्रश्न आहे. पूर्वपक्ष करणारांचें ह्मणणें आहे कीं खाजगी शाळा काढाव्या. पण त्यांनीं सरकारी शाळांची शिक्षणपद्धति ठेवूं नये. तर सरकारच्या शिक्षणपद्धतींतले दोष काढून टाकून सर्वांगशुद्ध अशी शिक्षणपद्धति सुरू करावयाची असली तर काढाव्या. अशा शाळांना सरकारी किंवा म्युनिसिपालिट्या वगैरे निम सरकारी संस्थांकडून आश्रय मिळण्याचा संभव नाहीं; आणि केवळ लोकाश्रयावर अशा संस्था चालण्याचा संभव फार कमी आहे. ही गोष्ट अनुभवसिद्ध आहे. तेव्हां करावयाचें काय या प्रश्नाचें उत्तर मात्र पूर्वपक्ष देत नाहीं. ह्मणजे पूर्वपक्ष निवळ ध्येयवादी आहे. त्याला व्यवहारज्ञान नाहीं असें ह्मणावें लागतें. आज फर्ग्युसन कॉलेज नसतें तर हजारों विद्यार्थ्यांना जो उच्च शिक्षणाचा लाभ घडत आहे तो घडला नसता. या गोष्टीकडे पाहण्याची त्याची इच्छा नाहीं. किंबहुना तो तिकडे मुदाम डोळेझाक करून इतक्या लोकांना उच्च शिक्षणाचा लाभ स्वल्प खर्चानें करून देणाऱ्या संस्थेवर आग पाखडण्यांत व स्वतः निष्क्रिय राहून कार्यकर्त्या स्वार्थत्यागी माणसाचा उपहास करण्याचा आसुरी मार्ग त्यानें स्वीकारला आहे. फर्ग्युसन कॉलेजच्या हातून या पूर्वपक्षाच्या कल्पनासाम्राज्यांतल्या ध्येयाप्रमाणें पूर्णांशानें कामगिरी घडत नाहीं, ह्मणून जी अल्प स्वल्प कामगिरी

घडत आहे ती ही त्याला नको आहे. लोकांच्या मुलांना सर्वांगसुंदर शिक्षण मिळालें तर हवें, नाहींपेक्षां ते ठोंच्ये राहिले तरी पतकरलें, पण अर्धवट शिक्षण नको, असा विलक्षण कोटिक्रम हा पूर्वपक्ष करीत आहे. उत्तर पक्षाचें यावर काय ह्मणणें आहे तें वर आमच्या विवेचनांत आलेंच आहे. ते ह्मणतात कीं आमच्या कृतींतले दोष आह्मांस दिसत नाहींत असें नाहीं, पण ते सध्याच्या स्थितींत अपरिहार्य आहेत. हे दोष टाळून सर्वांगसुंदर शिक्षणपद्धतीच्या शाळा कोणी काढतील व सरकारच्या आश्रयावांचून चालवून दाखवितील तर हव्याच आहेत. त्या प्रत्यक्ष चालवून दाखवा. कृतीनें तुह्मी आपला श्रेष्ठपणा प्रस्थापित करा. नुसतें ध्येयवादी— स्वतः निष्क्रिय राहून दुसऱ्याच्या चालत्या गाड्याला खीळ घालणारे— होऊं नका. पण हें या पूर्वपक्षास नको आहे. त्यांना नुसती बडबड हवी आहे, कृति करून दाखविण्याची पात्रताच त्यांचे ठायीं नाहीं. अस कल्पनेच्या वातावरणांत टोले जंगी वाडे उभारणारे देशाभिमानी पुरुष गाणिले जावे, आणि जे खरोखर स्वार्थत्याग करून आपला देशाभिमान अंशतः तरी कृतींत उतरवून दाखवितात ते उपहासास पात्र व्हावे यापेक्षां देशाचें दुसरें दुर्दैव तें कोणतें असणार?

## आणीबाणीचा प्रसंग.

मोनास्टिर वर बल्गेरियन लोक तूटून पडले आहेत, कोणी ह्मणतात ते त्यांनीं घेतलेंही. येवढी गोष्ट खरी आहे कीं जरी आज तें शत्रूच्या हातीं गेलें नसलें तरी कालांतरानें तें शत्रूच्या हातीं न पडूं देण्याइतकें सामर्थ्य सार्वियन लोकांच्या अंगांत नाहीं. सार्वियाचें दाक्षिणेकडील सैन्य व उत्तरेकडील सैन्य यांच्यांत फाटाफूट होणें ही गोष्ट आतां अपरिहार्य आहे. बल्गेरियानें मोनास्टिर घेऊन सार्वियन लोकांना ग्रीसच्या सरहद्दींत रेटीत नेणार हें आतां निश्चित आहे आतां ग्रीसवर आणीबाणीचा प्रसंग आहे असें ह्मटलें पाहिजे. एकीकडे आड व दुसरीकडे विहीर अशी त्याची स्थिति झाली आहे. हेग कान्फरन्समध्यें ठरलेल्या नियमाप्रमाणें त्यानें सर्बियन लोक जे हातीं लागतील त्यांचीं शस्त्रें काढून त्यांना अडकवून ठेवावयास पाहिजे. पण तसें केलें असतां फ्रेंच, व इंग्रज यांच्या हिताच्या आड गेल्यासारखें होईल. सर्वियन लोकांना जाऊं दिलें तर जर्मन केसरच्या रोषाला ग्रीस पात्र होईल. अशा अडचणींतून मार्ग काढणें हें काम अतिशय शहाणपणाचें व कठीण आहे. ग्रीस मुत्सद्यांच्या परीक्षेचीच ही वेळ आहे व त्यांतून ते कसे पार पडतात, व आपली सदिच्छाप्रेरित तटस्थवृत्ति कायम ठेवतात हें पाहण्याकडे साऱ्या जगाची दृष्टी लागून राहील.

## जखमी झालेला हिंदी राजपुत्र

नेपाळच्या मुख्य प्रधानाचे भाचे व टेहरी संस्थानच्या राणीसाहेबांचे बंधु राणा जोधजंग हे इंपीरियल कॅडेट कोअरमध्यें आहेत. हे स्वतःच्या खुषीनें लढाइवर गेले आहेत. फ्रान्समध्यें शत्रूशीं झालेल्या कित्येक लढायांत बहादुरी दाखवून लढत असतां ता. १२ आक्टोबर रोजीं यांच्या हातला जखम झाली. तरी ते लढत राहिले. दुसरे दिवशीं शत्रूच्या कुलपी गोळ्याचा एक तुकडा त्यांच्या गळ्याला लागून ते जखमी झाले. हा तुकडा शस्त्रक्रिया करून काढण्यांत आला आहे. वीरांना शस्त्राघात हें भूषण आहे.

## लज्जास्पद गोष्ट!

ग्रेट ब्रिटनमध्यें वीस लक्ष मुलें शिक्षणावांचून राहत आहेत ही गोष्ट पाहून लंडन टाइम्सला त्वेष चढला आहे आणि ही स्थिति ब्रिटिश राष्ट्राला अत्यंत लज्जास्पद आहे असे उद्गार त्या पत्रानें काढले आहेत. हाच न्याय तें पत्र हिंदुस्थानाला लावून पाहील व भूतदयेची समानदृष्टि ठेवून विचार करील तर त्याच्या तोंडून कशा प्रकारचे उद्गार निघतील! हिंदुस्थानांत लोकसंख्येच्या पृष्ठ भागाला ही शिक्षणाचा स्पर्श अद्याप झालेला नाहीं. एकतीस कोटि हिंदी प्रजेपैकीं चार कोटी मुलें शिक्षणाला अगदीं पारखीं आहेत व सक्तीचे शिक्षण सुरू करण्याविषयींची सूचना ना. मि. गोखले यांनां वरिष्ठ कायदे कौंसिलांत आणिली तेव्हां खुद्द सरकारी अधिकाऱ्यांनीं तिला कोणत्याना कोणत्या सबबी पुढें करून आपली प्रतिकूळता प्रदर्शित केली, या गोष्टी लंडन टाइम्सला माहित नसतील हें संभवनीय नाहीं. पण सरकारी अधिकाऱ्यांच्या या प्रातिकुलतेविरुद्ध या पत्रानें चकार शद्ब सुद्धां काढला नाहीं! वीस लक्ष ब्रिटिश मुलांना शिक्षणावांचून राहूं देणें ही गोष्ट जर लज्जास्पद असेल, तर हिंदुस्थानांतल्या चार कोट मुलांना शिक्षणाचा लाभ न मिळं देणें हें कितीपटीनें अधिक लज्जास्पद आहे हें कळण्यास विशेष बुद्धिमत्ता लागेल असें आह्मांस वाटत नाहीं. लढाई संपल्यानंतर ब्रिटिश सरकार व हिंदुस्थान यांच्या मधील संबंध विशेष निकट व अधिक प्रेमाचा घडणार आहे. त्यावेळीं तरी लंडन टाइम्सला हिंदुस्थानच्या या चार कोट मुलांची आठवण होवो ह्मणजे झालें.

## शिक्षण खात्याचा रिपोर्ट.

सन १९१४-१५ सालाबद्दलचा मध्यप्रांत आणि वऱ्हाडचा शिक्षणखात्याचा रिपोर्ट मे. डायरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन यांच्याकडून नुकताच प्रसिद्ध झाला आहे, तो पुष्कळ लोक मोठ्या उत्सुकतेनें वाचतील अशी आमची खात्री आहे. शिक्षणासंबंधानें पहिली पाहण्यासारखी गोष्ट ह्मणजे शिक्षणाप्रीत्यर्थ सरकारनें केलेला खर्च ही होय. रिपोर्टाच्या सालीं युरोपांतल्या युद्धाचा एकाएकीं प्रादुर्भाव होऊन सरकारला युद्धासाठीं मोठाल्या रकमा काढून द्याव्या लागल्या. सुदैवानें या आकस्मिक रीतीनें आलेल्या संकटाचा शिक्षणखात्यावर कांहीं परिणाम न होतां ४८॥ लक्ष रुपये या जकरीच्या बाबीवर सरकारला खर्चतां आले. म्युनिसिपालिट्या, लोकलफंड व खाजगी फंड यांनी खर्च केलेल्या रकमा अर्थातच या रकमेंत धरलेल्या नाहींत. दुसरी गोष्ट शिक्षणाचा प्रसार किती झाला हे पाहणें. याही बाबतींत समाधानकारक प्रकार आढळतो. गेल्या वर्षांत हायस्कुलांत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ४७१ नें वाढली व ६ नवी हायस्कुलें उघडण्यांत आलीं. पैकीं तीन सरकारी व्यवस्थेखालीं आहेत. पण येवढ्यानें हायस्कुलांतल्या विद्यार्थ्यांच्या वाढीची खरी कल्पना व्हावयाची नाहीं. त्याबरोबर हें ही सांगितलें पाहिजे कीं हायस्कुलांत अधिक मुलांची सोय करतां यावी ह्मणून खालचे वर्ग म्युनिसिपालिट्यांचे ताब्यांत देण्यांत आले आहेत. प्रत्येक जिल्ह्याचे ठिकाणीं एक तरी सरकारी हायस्कूल असावें अशी सरकारची इच्छा आहे. पण तेवढ्यानें ही काम भागणार नाहीं. या साठीं खाजगी हायस्कुलें निघावीं व सरकारी हायस्कूलें ह्मणजे केवळ नमुनेदार संस्था ह्मणून असाव्या असें ही मे. डायरेक्टर साहेब रिपोर्टांत सुचवीत आहेत. त्या बरोबर आह्मांला पुण्याच्या हायस्कुलाच्या अनुभवावरून हें ही सुचविणें भाग आहे कीं नुसते युरोपियन हेडमास्तर किंवा भारी पगाराचे देशी शिक्षक ठेवल्यानें शिक्षणसंस्था नमुनेदार होत नसते. त्या शाळेंतली शिक्षणपद्धति, शिस्त, गुरुशिष्यांमधलें प्रेम, मुलांचा विद्यार्जनाविषयींचा उत्साह, परीक्षेचे निकाल, वगैरे अनेक गोष्टींचा त्यांत अंतर्भाव होतो. अशी नमुनेदार शिक्षणसंस्था प्रत्येक जिल्ह्याचे ठिकाणीं असणें सर्वतोपरी इष्ट आहे. त्याच्या योगानें खाजगी शिक्षणसंस्थांनाही हुरूप येऊन एकंदर शिक्षणाची मर्यादा उच्च प्रतीची होते. पण सरकारी नमुनेदार हायस्कुलांचा इतर इलाख्यांतला अनुभव या अपेक्षेला विशेषसा अनुकूल दिसत नाहीं. मिडल स्कुलांच्या संख्येंत गेल्यासालीं ३२ ची आणखी भर पडली आहे व विद्यार्थ्यांची संख्या २००० नें वाढली आहे हीही समाधानकारक गोष्ट आहे. यांतलीं बहुतेक खाजगी प्रयत्नांनें स्थापन झालेलीं आहेत. शिक्षणाच्या संबंधांत सरकारनें आपल्यापुढें जें ध्येय ठेविलें आहेत तें खरोखरीच फार स्पृहणीय आहे. कित्येक आंग्लोइंडियन-पत्रें ह्मणतात त्याप्रमाणें उच्च शिक्षणाचे हातपाय तोडून प्राथमिक शिक्षणांत भर घालावयाची हें या प्रांतांतल्या सरकारचें ध्येय नाहीं. तर प्राथमिक, मध्यम, व उच्च या तिन्ही शिक्षणाची सारखी वाढ करावयाची हें तें ध्येय आहे. उच्च शिक्षणासंबंधानें कांहीं महत्त्वाच्या योजनाही तूर्त सरकारपुढें विचारासाठीं आलेल्या आहेत. त्यांतली एक मध्यप्रांताच्या युनिव्हर्सिटीची योजना ही आहे. या योजनेंतले अनेक दोष लोकांचे पुढाऱ्यांनीं व वर्तमानपत्रकारांनीं दाखविले आहेत. त्यांचा योग्य विचार करून व लोकमतास मान देऊन सदर योजनेंत फेरफार करण्यांत आले तरच युनिव्हर्सिटी ही संस्था या प्रांताला हितावह होईल. नाहींपेक्षां नव्या संस्थेनें जुन्या शिक्षणपद्धतीस बरें ह्मणविलें असा प्रकार होऊन सरकारनें शिक्षणाप्रीत्यर्थ खर्च करण्यासाठीं काढून ठेविलेला पैसा अनाठायीं गेला याबद्दल लोकांना अत्यंत हळहळ वाटून मुलांच्या शिक्षणाची गैरसोय दूर व्हावयाची राहिली ती राहिलीच, उलट खर्चाचा बोजा मात्र डोक्यांवर बसला, असें वाटूं लागेल. असें वाटूं देणें कदापि श्रेयस्कर होणार नाहीं. ह्मणून आह्मी सरकारास अशी विनंति करतों कीं मध्यप्रांतांत प्रथमच स्थापित होणारी युनिव्हर्सिटी लोकांच्या सोयीगैरसोयीकडे लक्ष देणारी व साऱ्या हिंदुस्थानांत खरोखर नमुनेदार होईल इकडे त्यांनीं लक्ष द्यावें.

## मध्यप्रांतीय प्रांतिक परिषद्.

### दिवस दुसरा

मागील अंकावरून पुढें चालू

पहिल्या दिवशीं अध्यक्षांचे ना. बिशन दत्त शुक्र यांचें सर्व प्रस्तुत विषयांचें समालोचन करणारे विस्तृत भाषण झालें व दुसरे दिवशीं ता. १७ रोजीं परिषदेच्या कार्यक्रमास विषय नियामक मंडळीनें निवडून दिलेल्या ठरावांच्याच दिशेनें कार्यक्रमास प्रारंभ झाला. व लोकांची उत्कंठा पूर्वदिनापेक्षांही अधिक जोमदार दिसली. पाहिले तीन ठराव अध्यक्षांनीं मांडण्याइतकेच महत्वाचे व सर्वमान्य होते हें पुढील ठरावावरूनच चटदिशीं लक्षांत येईल

**ठराव पहिला**—'प्राश्चिमात्य संस्कृती व सुधारणा व त्यांची स्वातंत्र्य व स्वाभिमान हीं ध्येयें हिंदूलोकापुढें मांडणें' एतद्विशिष्ट जे अनेक फायदे ब्रिटिश राजसत्तेनें हिंदुस्थानाला दिले त्या फायद्यांची कृतज्ञतेनें जाणीव ठेऊन ही परिषद् सम्राट पंचम-जॉर्ज यांनां आपल्या राजनिष्ठेचें आश्वासन देतें.

**ठराव दुसरा**—ही परिषद् असल्या आणीबाणीच्या वेळीं साम्राज्याच्या शूर सैनिकांना व राजनिती कुशल मुत्सद्यांना सत्पक्षप्रतिपादन यशस्वी करण्याच्या त्यांच्या निर्धाराच्या प्रयत्नास मनःपूर्वक व सर्व प्रकारें सहाय करण्याची इच्छा दर्शविते.

**ठराव तिसरा**—ज्यांत प्रत्यक्ष अर्वाचीन संस्कृती जिविताबद्दल धडपडत आहे. अशा या जगव्यापी युद्धांत सरकारच्या ज्या विश्वासूपणाच्या धोरणामुळें हिंदुस्थानचा शिरकाव झाला त्या धोरणाबद्दल ही परिषद् कृतज्ञतापूर्वक आभार मानिते; व हिंदू लोकांना सैन्यांतील शिपाई व वरिष्ठ अधिकारी या नात्यानें साम्राज्यसेवा करण्याची अधिकाधीक संधी मिळत जाऊन, जगांतील राष्ट्रांच्या सुयंत्रित व शांततेनें चालणाऱ्या प्रगतीस खिळ घालूं पाहणाऱ्या या जुलमी लष्करीबाण्याचा संहार करण्यास हिंदुस्थान कारणीभूत होईल अशी आशा प्रदर्शीत करिते.

**ठराव चवथा**—"खात्रीच्या व निर्वेध मार्गाचें आक्रमण करून हिंदुस्थानाला 'राजकीय स्वातंत्र्य विकास' हें ध्येय कालांतरानेंच कां होइना पण निश्चयानें गाठतां येईल व मग स्वाभिमान व शील यांच्या मजबुतीमुळें आणि प्रेम व कृतज्ञतेच्या बंधनांनीं बद्ध झाल्यामुळें हिंदुस्थानाला आपण 'एक विश्वासू आश्रित' असें न समजतां आपला 'बरोबरीचा सन्मित्र' असें समजूं लागूं" असें जें व्हाइसराय साहेबांनीं भाषण केलें त्याबद्दल ही परिषद् त्यांचे आभार मानिते व याप्रमाणें आरंभिलेल्या धोरणास लवकरच फल प्राप्त होईल अशी इच्छा प्रदर्शित करिते.

या ठरावावर रा. जकातदार यांचें भाषण झालें. १८३३ व १८५७ सालीं हीं असलींच विधानें करण्यांत आलीं होतीं

पण लॉर्ड लिटन साहेबांनीं ' गुप्त खलीत्यां-तून श्रमाचा भोपळा फोडला व त्या विधा-नामुळें मिळणारे हक्क नुसते शद्बांतच ठेऊन आमची प्रतारणा करावी असें लिहिलें. लॉर्ड कर्झन यांनीं राणीच्या जाहिरनाम्यावर ' अशक्य सनद ' असा छाप मारिला. लॉर्ड हार्डींज साहेबांच्या या उदारोक्तिमुळें उडालेला वि-श्वास पुनः जागृत झाला आहे या बद्दल त्यांचें अभिनंदन करणें जरूर आहे.

रा. माधवराव पाध्ये यांनीं या ठरावास दुजोरा देतांना इंग्रजींत सणसणीत भाषण केलें. ' हिंदुस्थानाला सरकार आतां पर्यंत ' एक विश्वासू आश्रित ' समजत होतें पण यापुढें ' एक विश्वासू मित्र ' समजणार, हें आश्वासन जरी पुढाच्या प्रसूती वेदनामुळें दिलें आहे तरी तें खरें करून घेण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे. मागेंही अशीच आश्वासनें दिलीं होतीं तीं सर्व फोल झालीं आहेत. सरकारास हें वचन न विसरण्यास आपण बनाविलें पाहिजे. गांधीलमाशी कि-ड्याला चावून चावून अखेरीस आपल्या सारखी गांधीलमाशी बनविते त्याप्रमाणें इंग्रज लोक आपल्याला इतके दिवस चाऊन आतां आपल्यासारखें बनविणार आहेत. आपल्यामध्यें कर्ते तरवार बहादूर निर्माण झाले पाहिजेत, नुसते पदवीभूषित लेखणी बहादूर काय कामाचे ? आमचे सैन्य ट्रान्स-वालांत नेण्यांत आलें असतां तें कां नेतां असें विचारण्याचा हक्क आह्मांस प्राप्त झाला पाहिजे तरच व्हाइसरॉय साहेबांच्या या वचनाची सफलता झाल्यासारखी होईल " अशा अर्थाचें भाषण होऊन ठराव टाळ्यां-च्या गजरांत पास झाला.

यानंतर ना गोखले, कॉटन व सर फेरोजशहा यांच्या मृत्युबद्दल खेदप्रदर्शक तीन ठराव पुढें मांडण्यांत आले. सर फेरोज-शहा बद्दल ठराव पुढें मांडतांना श्री. दादा-साहेब खापर्डे यांनीं सुश्राव्य भाषण केलें. मेथांची व माझी फार जुनी ओळख, मेथा हे १६ व्या वर्षी मॅट्रिक पास झाले व २४ व्या वर्षी विलायतेहून ब्यॅरिस्टर होऊन आले- अगदीं लहानपणापासून त्यांच्यांत कित्येक लोकोत्तर गुण होते. ते आपले विचार शांतपणें करीत व भाषणाच्या वेळीं मात्र भाषा फार कडक वापरीत. वादवि-वादांत ते कधींही कोणाला भीत नसत. मतभेद होऊन कितीही वाद झाला तरी सहकारिता करण्यास त्यांची तयारी असे. एकदां गव्हर्नरशीं व्हॉलंटिअरच्या हक्का-संबंधानें फार कडाक्याचा वाद झाला, तरी दुसरे दिवशीं मेथा आपले गव्हर्नर-साहेबांच्या बंगल्यावर लेव्हीला तयारच ! प्रतिपक्षास ते कधींही मर्मभेदक बोलत नसत. दुसऱ्यास वादांत चिडवून तो बह-कला म्हणजे आपली बुद्धी स्थीर ठेऊन त्याला पतंगाप्रमाणें हवा तसा कसा खेळ-वावा हें वादशास्त्रांतलें गुह्य त्यांस पूर्णपणें माहित होतें. पारशी हे परकीय असल्या कारणानें स्वतंत्र आहेत. हिंदुस्थानाशीं त्यांचा संबंध नाहीं असें त्या वेळेस पुष्कळ पारशी लोक, म्हणत पण मेथांचें मत " आधीं मी इंडियन आहे व नंतर पारशी आहे " हें प्रतिपादण्याकडे असे त्यांच्या मृत्युमुळें फार हानी झाली आहे. " या प्रकारचें भाषण होऊन ठराव टाळ्यांच्या गजरांत पास झाला.

अपूर्ण

## मल्हारी मार्तंड.

### (इंदूरची उन्नत ध्वजा.)

होळकरशाहीच्या राजधानीच्या शहरीं श्रीमन्महाराज सवाई तुकोजीराव होळकर यांचे वाढदिवसाचे शुभ मुहूर्तावर तारीख २१ नोव्हेंबर रोजीं, खुद्द महाराजांचे आ-श्रयाखालीं एका साप्ताहिक पत्राचा जन्म झाल्याचें ऐकून फार आनंद झाला. सध्याचे प्रगतीचे कालामध्यें नाना सुधारणा संस्थानां-त घडवून आणण्या साठीं लोकमत व त्याच प्रमाणें राजमत व्यक्त होणें फार श्रेयस्कर असून अशा पत्राची आज कित्येक वर्षें त्या संस्थानांत फार जरूर होती. हें पत्र संस्था-नांतील मराठी व हिंदी या दोन्ही भाषामध्यें निघावयाचें असून त्यांत संस्थानचे प्रगतीस हितावह असेच लेख छापण्याचा संपादकाचा हेतू असावा असें पहिल्या अंकांतील लेखा-वरून दिसून येते. या आमच्या नवीन बंधूचा जन्म संस्थानचे शुद्ध वातावरणांत, व महोत्सवाचे सुमुहूर्तावर झाला असून याची बाळपणांतील जोपासना अनुभविक व कसलेले लेखक रा. रा. वासुदेव गोविंद आपटे यांचेकडे सोपविलेली आहे. अशा परिस्थितींत आमचे भावंडास प्रेसअक्टरूपी सटीची बाधा होणें अशक्य आहे. सदहू पत्राची उत्तरोत्तर भरभराट होऊन त्यांस राजाश्रयाचे जोडीस लोकाश्रयही मिळो असें आह्मी मनापासून इच्छितों.

# वऱ्हाडवृत्त.

**हवामान**—थंडीला प्रारंभ पुनः होत चालला असून अभ्रें चोहोकडे ओसरत आहेत. दवाची वाढती वृष्टी रब्बीच्या पीकाला उत्तम जीव व नेम आणील. रोगराई उतरत्या कळावर असून आमच्या शहरची वस्ती हळू हळू भरत आहे.

रा रा. स्लाय साहेब हे स्पेशल ड्यु-टीवर येथें आले असून इंग्रजी व मराठी आफिसांची रचना पुनः काटकसरीनें कर-ण्याचें घाटत आहे.

गेल्या गुरुवारीं राजश्री स्लाय अबकारी-रीचे मुख्य अधिकारी राजश्री मेन व येथील डिपुटी कमिशनर यांची सभा अब-कारी खात्यांत काटकसरीची योजना करण्या-साठीं भरली होती.

रा. रा. सी. ब्राऊन आफि. डिपुटी कमि-शनर, खांडवा यांस वाशिमास सब डिव्ही-जनल आफिसर नेमण्यांत आलें.

### जाहीरनोटीस

मी खालीं सही करणार रुपचंद राम-प्रताप राठी रा० खामगांव या लेखावरून सर्वत्रांस जाहीर करितो कीं देवराव हरी सैतवाल रा० बाळापूर या नांवाच्या इसमानें मुरतानचंद चांडक खामगांवकर यांच्या मार्फत माझे कडून तारीख ६ माहे ९ सन १९१५ रोजीं अथवा त्या सुमारास एक कुलमुखत्यारपत्र करून घेतलें आहे. माझा चुलता गोविंदराम दानमल खामगांव-कर याच्या इस्टेटींतील हिस्सा मिळवून देतो व त्याबद्दल पैसे वगैरे लावतो अशा थापा देऊन व मजला सर्वस्वी फसवून वरील तारखेस एक कुलमुखत्यारपत्र व नंतर एक लिखत असे दोन कागद करून घेतले आहेत. या लिखतांत अगर मुख-त्यारपत्रांत काय लिहिले आहे हे मजला वाचून व समजून सांगितले नाहीं, केवळ थाप देऊन लबाडीनें मजला फसवून हे दोन्ही कागद करून घेतले आहे. माझ्या चुलत्याचे व माझे वास्तविक कांहीं भांडण नाहीं. व त्याचे जिनगीवर मजला हक्कही सांगावयाचा नाहीं. करितां त्या मुखत्यार-पत्रावरून माझ्या साठीं त्यांस कोणीही जातीवर अगर गहाणावर कर्ज देऊं नये. अगर त्यापासून कांहीं एक खरेदी घेऊ नयें. माझे करितां कर्ज दिल्यास अगर गहाण खरेदी घेतल्यास त्याची जबाबदारी माझेवर नाहीं. माझे वकील रा. वासुदेव बाळाजी पिंपळीकर रा० मलकापूर यांचे मार्फत नोटीस देऊन त्याचे मुखत्यारपत्र रद्द केले आहे. व हें सर्वत्रास कळावें म्हणून ही जाहीर नोटीस दिली आहे. ता० ९।१०।१९१५ मुक्काम मलकापूर.

दस्तूर कृष्णाजी रामचंद्र निमगांवकर रा० मलकापूर.

सही

रुपचंद रामप्रताप राठी रा० खामगांव हल्ली मुक्काम मलकापूर द. खु.

नो. नं. ४००

### नोटीस

रा. रा. देवराव हरी सैतवाल रा. बाळापूर नि. आकोला.

यांसः—

रुपचंद रामप्रताप राठी रा. खामगांव यांचे तर्फे रा. रा. वासुदेव बाळाजी वकील रा. मलकापूर यांजकडून नोटिस देण्यांत येते कीं, आमच्या पक्षकाराकडून तुह्मी ता. ६-९-१९१५ रोजीं च्या सुमारास एक कुल-मुखत्यारपत्र आणि एक कांहीं करारनाम्या सारखे लिखत असे दोन कागद त्यास फस-वून व थाप देऊन केवळ लबाडीनें करून घेतले आहेत. त्याचा चुलता गोविंदराम दानमल याच्या इस्टेटींत वस्तुतः त्याचा कांहीं एक हक्क संबंध नसतां त्यांस हिस्सा मिळवून देण्याची आणि त्या बाबतींत पैसा लावून खटपट करण्याची थाप देऊन त्यास फसवून हे कागद करून घेतले आहेत. करितां या नोटिशीनें तुह्मास कळ-विण्यांत येते कीं, त्यानें दिलेले मुखत्यार-पत्र ता. ६-९-१५ इसवीचे या पूर्वीच नोटिस देऊन रद्द केलें आहे. व आज रोजीं पुन्हा आमच्या मार्फत ही नोटीस देऊन तेंच कळवित आहे. त्या मुखत्यारपत्रावरून तुह्मास आमच्या पक्षकारा तर्फे कोर्टांत अगर कोर्टाबाहेर कोणतेही काम करण्याचा अधिकार नाहीं. ते मुखत्यारपत्र आणि करारनामाही रद्द आहेत. करितां ते आमच्या पक्षकारांस ही नोटीस पावताच तीन दिवसाचे आंत परत करून त्याची पावती घ्यावी तसें केलें. नाहीं तर तुमचेवर कायद्या प्रमाणें तजवीज करण्यांत येईल.

सही.

वासुदेव बाळाजी पिंपळीकर वकील.

नो. नं. ४०१

### नोटीस

सूर्यभान वा। दसराजी जात गासीमाळी राहणार मौजे बाभळी ता. दर्यापूर

यांसः—

खालीं सही करणार इजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तूं माझा लग्नाचा नवरा असून लग्न होण्यास सरासरी ११-१२ वर्षे झालीं. व मला शाहाणी होण्यास सरासरी ५ वर्षे झालीं. तेव्हांपासून मी पांच सहा वेळां आली, मी शाहाणी झाल्यावर मी तुमचे घरीं एक वर्ष होती, परंतु तुह्मी मला चांगलें रितीनें वागावेले नाहीं. नेहमीं मार ठोक करीत असा, अखेरीस माझे अंगावरील दागिने काढून घेऊन मला घरांतून काढून दिलें. व सांगितलें कीं, जर तूं माझे घरीं येशील तर मी कातडे लोंबविन व पत्ता ठेवणार नाहीं. त्याधाकानें मी आपले आई बापाचे घरीं जाऊन राहिले. त्यास चार वर्षे झाले, मी आपले बापाचे गांवीं लोकांचें कर्ज काढून पोट भरले, त्यामुळें मला लोकांचें रुपये ३०० कर्ज झालें. मी बरेंच वेळां येऊन जाण्याबद्दल तुह्मास ह्मटलें असतां तुह्मी मला घेउन गेले नाहीं. करितां तुह्मास नोटिशीनें कळविले जाते कीं, आठ दिवसाचे आंत तुह्मी मजवर झालेलें कर्ज रुपये ३०० देऊन मला घेऊन जावें. व चांगले रितीनें वागवावें तसें न केल्यास नोटिस हीच फारकती समजून मी दुसऱ्याशीं गंधर्व करीन. मग तुमची कोणतेही प्रकारे मजवर सत्ता राहणार नाहीं. ता. १३ १०-१९१५

सही

सारजी मर्द सूर्यभान नि. आंगठा खु.

नो. नं ४०२


### सर्व बालरोगांवर वस्ताद.

### बालामृत वटिका.

एकच वेळ वापरण्याची शिफारस. खोटें ठरविणारांस शेकडों रुपये बक्षीस देण्या-इतके आह्मी श्रीमंत नाहीं. परंतु साहेब, एकदाच खात्री करून पहा. ३० गो. किं. ॥- टॅ. ख. वेगळा. प्रत्येक शिशी सोबत इनामाचे १ टिकीट बक्षीस. निकाल सून अखेर विशेष खुलासा आजच मागवा.

बळवंतराव सकळकळ

वऱ्हाडसमाचार ऑफिस आकोला

## आठ आण्यांत लूट,

( खालील सर्व बुकें फक्त आठ आण्यास मिळतील )

१ **कोकविद्या**—सचित्र व समग्र कोकशास्त्र

२ **रसायनविद्या**-सोनें चांदी कमावण्याची युक्ति

३ **मंत्रविद्या**—मंत्रसिद्धीच्या योगानें सर्व रोग बरे करणें.

४ **मृतात्मा**शीं संभाषण करण्याची युक्ती.

५ **गानविद्या**—गायनसंबंधीं शिकण्याची विद्या.

**वशीकरण**—विद्या.

**पत्ता**—स्टेट व बाळबेधीत लिहावा.

प्रयाग नारायण अग्रवाल अलीगड सिटी.

## जाहीर नोटीस.

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येते कीं, रामजी व सारजी मर्द रामजी ( वासुदेव ) गोंदळी रा. आकोलखेड ता. आकोट यांचा मुलगा नामें सिताराम यांस मी तमाशांतील गायन व नाच काम शिकवून तयार केले आहे. याबद्दलचे माझ्या मेहनतीचे रु. ३०० तीनशें घेणें आहेत. तरी सदर्हु मुलास माझे रु. देऊन माझी भर पावती घेतल्या शिवाय कोणीही ठेऊं नये; ठेविल्यास सदर्हु रु. कोर्ट मार्फत मी वसूल करवून घेईन. ही जाहिर नोटिस दिली. तारीख

सही
गणपत हरी गुरव रा. आकोलखेड
ता. आकोट दस्तूर खुद
नो नं० ३९८

## नोटीस

रा. रामजी व सारजा मर्द रामजी मात गोंदळी उभयतां रा. आकोलखेड ता. आकोट यांसः—

नोटिस देणार गणपत हरी गुरव रा. आकोलखेड ता. आकोट नोटिस देण्यांत येतें कीं, मी तुमचा मुलगा नामें सिताराम यांस तमाशा करितां गायन व नाच काम शिकविले आहे. व त्यास घेऊन फिरावयाची वेळ आली असून मुलाला मजकडे पाठवावयाचे अजीबात बंद केले आहे. तरी तुह्माला मुलगा जर दुसऱ्या तमाश्याच्या फडांत पाठवावयाचा असल्यास तुह्मी माझ्या मेहनतीबद्दल रु. तीन वर्षाचे ३०० तीनशें देऊन माझी पावती घ्यावी. माझ्या पावती शिवाय मुलाला दुसरीकडे कोठें ही नाचविल्यास अगर घरीं ठेविल्यास माझ्या मेहनतीबद्दल रु. ३०० न दिल्यास मी तुह्माकडून कोर्ट मार्फत वसूल करीन. कळावें. ता.

सही
गणपत हरी गुरव रा. आकोलखेड
द. खुद
नो. नं. ३९९


सतत ४२ वर्षे चाललला कारखाना.

## ए. जे. ह्मात्रे आणि सन सुगंधी.

ठिः--पांजर पोळचा नाका, चिमणलालमहाराजांचे मंदीर भुलेश्वर – मुंबई.

एकच भाव! ओटो मुरगीं ! एकच भाव! !

### आमचेकडे मिळणारा माल

ओटो मुरगी

**अत्तरें.**— गुलाब, मोतिया, दवणा, अंबर, बकूल रुपाच, हिना, पाच, वाळा, जुई चांफा, अंबा, इस्तंबोल, केशर, मदनबाण पारिजातक, मुस्काहिना, गुलाहना, रुअबझा, केवडा, रुखस, चमेली, अगर. हीं अत्तर दर तोळ्यास १ रुपयापासून ८ रुपयेपर्यंत निरनिराळ्या भावाचीं मिळतील. २-३-४ ६ रु.

**तेलें.**— चमेली, बेलिया, मुसुंबी, हिना, लिंबु, मेंदी, गुलाब, मसाला, नारंगी, सुगधराव, मोतिया, आवळा, नागर, कपाशी.

वरील तेलें दर रुपयास ६ तोळ्यापासून २८ तोळेपर्यंत निरनिराळ्या भावाची मिळतील दर बाटली ४ आणे.

अष्टगंधी अरगजा १ तोळ्यास ४ आ. ६ आ. १२ आ. १ रु. १॥ रु. पर्यंत अरगजा व कितना निरनिराळ्या सुवासाचा दर डबीस ३ आ. ४ आ. ६ आ. ८ आ. १ रु. उटणें दर डबीस १ आ. २ आ. ४ आ. ८ आ. पर्यंत. केशरी गोळी उत्तम २॥ आ. ५ आ. १० आ. १। रुपयापर्यंत. क्याटलॉग फुकट

ह्याशिवाय कस्तुरी, केशर, गुलाबपाणी मध, उदबत्ती, रंगीत पाट, दशावतारी गंजिफे, सोंगट्या, बुद्धिबळें, आर्यवर्धक कार्डस, बिझिक, इसापिकें, हस्तीदंती फासे व फण्या, पितळी सामान, पितळी शिंगे व करणे, चंच्या, सरबतें व मुरंबे, पक्या तारा, बदामाचें तेल, व वातहारक आणि केशवर्धक तेलें, सुर्दे व वेणीचें गंगावन इत्यादि वरील पत्त्यावर मिळेल. व्यापाऱ्यांस सवलत.

बाहेरगांवच्या गिऱ्हाईकांस माल व्हल्युपेबलनें पाठविला जाईल. नो. नं. १



ॐ नमः श्रीगणेशाय.

## आर्यवनौषधींचा कारखानाः—मुर्डी.

### मदनामृतसंजीवनी.

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक व पौष्टीक, वीर्यस्तंभक, रक्तशोधक, मनोत्साहक कांतिबुद्धिवर्धक, सुवर्णमाक्षिक, मौक्तिक, कस्तूरी व अनेक वनस्पतीमिश्र अद्भुत गुटिका.

यांच्या सेवनानें नपुंसकत्व, स्वप्नजन्य व इतर धातुपात, उन्हाळे इंद्रियशिथिलता कडकी, गर्मीसंबंधी सुरळेले विकार, मूत्रसंकोच, धातूचा पातळपणा, स्त्रियांची धुपणी, छातींत रोग हात, पाय मूत्रमार्ग व नेत्र यांचा दाह, क्षय, पांडुरोग, मुलांची खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य; मस्तकशूल, मुळव्याधी, वातरोग, निद्रानाश, पित्तविकार बाळांतरोग, मधुमेह, जुनाट पर्मा, मुष्टीमैथुनानें आलेली कृशता इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी, मजबूत व सतेज बनते. पचनशक्ती व स्मरणशक्ति भरपूर वाढून धातू व रक्त यांची शुद्धि, वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दीपन होतें, व मनास उत्साह देतात. दूध व जडान्न भरपूर पचूं लागतें. त्यांत उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण केले असल्यामुळें त्यांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून वराल विकारांवर अत्यंत गुणकारक आहेत, करितां गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकिटा मिळाल्या व नित्य मिळतात. पथ्यसेवनाची गरज मुळींच नसून स्त्रिया, पुरुष व मुलें यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहेत.

का रुपयांचे आंत मिळणार नाहींत. एकदम ४ रुपयांच्यावर कितिही घेणारास टपालखर्च माफ आहे. चार रुपयाचें आंत वेगळा टपालखर्च ५ आणे पडेल. दर एकदम ३५ गो० १ रु० ७५ गो० २ रु० १६५ गो० ४ रु० २७५ गो० ६ रु० ५५० गो० १० रुपये.

१. **अपूर्व नेत्रांजन**—यानें वडस, सारा, फुलें, खुपऱ्या, बिंदु, काच, इ० नेत्रांचें सर्व विकार त्वरित बरे होऊन दृष्टि तीव्र व थंडगार राहते. या रोगास हें अंजन खरें रामबाण आहे. १॥ तो. ड. १ रु.

२. **परम्यावर अपूर्व मिश्रण**—कोणत्याही नवा जुना पर्मा व तज्जन्य दाह. तिडीक, मुत्रांची लाली, संकोच, पुयस्त्राव, रक्तस्त्राव इत्यादि विकार पथ्य नसतां सात दिवसांत जातात. तिडीक एका घटकेंत जाते. असे रामबाण औषध कोठेंच मिळत नाहीं. बा० किं० १ रु० १। भार २ रु० सर्व औषध व्ही० नें पाठवूं.

सर्व सामानाचा मोठा क्याटलाग मागवावा. तो फुकट पाठवूं. औषधांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून तीं पूर्ण खात्रीची असल्याबद्दल असंख्य सर्टिफिकिटें आहेत. याशिवाय मोठमोठे रोगांवर अनेक औषधें, ग्रंथोक्त रसायनें, भस्में, पाक, गुटिका आसवें, तेलें व सुगधी अत्तर वगैरे माफक दरानें मिळतात. अनु० ख० सो० ट० ख० वे० पडेल. रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं. प्रकृतिमान कळविल्यास रोग्याचें निदान व चिकित्सा कळवूं.

पत्ताः—मु० मुर्डी, पो० हर्णै, जिल्हा रत्नागिरी. } कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य.

नो० नं० ३६९



## Oriental Government Security Life Assurance Co., Ltd.

ESTABLISHED 1874.

HEAD OFFICE, BOMBAY. R. PATERSON BROWN MANAGER.

### FUNDS almost 5 CRORES.

INVESTED IN GOVERNMENT SECURITIES AND MUNICIPAL AND PORT TRUST BONDS.

*Claims paid* $4\frac{1}{2}$ CRORES

### A Decennial Record of Progress.

| Year. | No. of Polices in force. | Existing Assurances. |
|---|---|---|
| 1884 | 4.823 | 1,59,25,200 |
| 1894 | 20,110 | 5 26,08,850 |
| 1904 | 43,356 | 8 88,02,223 |
| 1914 | 65,269 | 12,37,10,910 |

| Year. | Total Income. | Total Assets. |
|---|---|---|
| 1884 | 6,77,552 | 14,41,429 |
| 1894 | 4259,,607, | 94,49,971 |
| 1904 | 43,64,808 | 2,47,18,89 |
| 1914 | 72,46,0 | 4,96,86,509 |

### BONUS

The bonus for the premium ending 31 December 1912, constitntes a record for the company. The next Division of profits will be made at 31 December of the current year when all With Profit Policies effected prior to that date will participate—

### *SPECIAL FEATURES.*

Absolute Security—Low Rates—Liberal Conditions.
Forty years continuously increasing prosperity.
Ninety per cent of the entire Profits, after proviaing for the Reserve Fund, divided among the Policyholders every 3 years.
Native Lives are accepted at the same rates as Europeans
Loans granted to policyholders at reasonable rates.
Prompt Payment of Claims.

:0-

Full particulars, prospectus and proposal forms on application to:—

Influential and energetic Agents wanted-Terms liberal

**M. deSOUZA,**
CHIEF AGENT,
C. P. Berar & Khandesh
Nagpur.

N. N. 25


हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवाश्रमांत छापून प्रसिद्ध केलें